सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## वक्फ कायद्याविरोधातील याचिकांवर तात्काळ सुनावणीस सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

लोकसभा आणि राज्यसभेत वक्फ सुधारणा विधेयक मंजूर झाले. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यावर स्वाक्षरी केल्यानंतर वक्फ सुधारणा कायदा अस्तित्वात आला आहे. पण, याला विरोध असणाऱ्या काही राजकीय पक्ष, संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सोमवारी (७ एप्रिल) सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याकडे याचिकांवर तात्काळ सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली. सरन्यायाधीशांनी याचिकांकर्त्यांचे कान टोचत तात्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला.

कपिल सिब्बल यांनी सोमवारी जमात उलेमा ए हिंदचे अध्यक्ष मौलाना अर्शद मदनी यांच्यावतीने याचिका दाखल केली. वक्फ सुधारणा कायद्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिका एकत्रित करण्याची मागणी केली.सुनावणीवेळी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सिब्बल यांना प्रश्न विचारला की, 'ईमेलद्वारे तात्काळ सुनावणी करण्याची प्रक्रिया आहे, मग मौखिक पद्धतीने याचा उल्लेख का केला जात आहे?' सरन्यायाधीशांनी सिब्बल यांना मेन्शनिंग लेटर सादर करण्यास सांगितले. मेन्शनिंग लेटर आधीच सादर करण्यात आले आहे, अशी माहिती सिब्बल यांनी सरन्यायाधीशांना दिली. त्यावर सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले की, 'मी दुपारनंतर ते तपासून घेईन आणि त्यानंतर




आवश्यक ती कार्यवाही करेन.'सर्वच महत्त्वाची प्रकरणे दुपारनंतर माझ्यासमोर ठेवली जातील. जर आपल्याकडे एक प्रक्रिया आहे, तर मग तुम्ही मौखिक पद्धतीने याचा उल्लेख का करत आहात? हे प्रकरण दुपारनंतर माझ्यासमोर ठेवलं जाईल. तेव्हा मी आवश्यक कार्यवाही करेन', असे उत्तर देत सरन्यायाधीशांनी याचिकांवर तात्काळ सुनावणी करण्यास नकार दिला.

**तीन याचिका आधीच दाखल**

वक्फ सुधारणा कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात तीन याचिका अगोदरच दाखल केल्या गेल्या आहेत. केरळातील जमीयत उलेमाने ६ एप्रिल रोजी या कायद्याला आव्हान दिले आहे. तर आपचे आमदार अमानतुल्लाह खान, काँग्रेसचे खासदार मोहम्मद जावे आणि असोसिएशन फॉर प्रोटेक्शन सिव्हील राइट्स यांच्याकडून इतर तीन याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

## दीनानाथ रुग्णालयाचे डॉ सुश्रुत घैसास यांचा राजीनामा

### तनिषा भिसे मृत्यूप्रकरणी डिपॉझिट मागितल्याचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७पुणे**

पुण्यातील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर रुग्णांच्या जीवापेक्षा पैशांना प्राधान्य दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. २९ मार्च रोजी झालेल्या या दुर्दैवी घटनेत तनिषा भिसे (वय २७) या सात महिन्यांच्या गर्भवती महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाला. त्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे.राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली होती. आज प्रत्यक्ष महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी भिसे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे. त्यानंतर रुग्णालयाला समज देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रुग्णालय दोषी असून कारवाई होणार असल्याचेही त्यांनी सांगितले होते. या प्रकरणात आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.




गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी डॉ घैसास यांनी राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला आहे. हॉस्पिटल प्रशासनाची होणारी बदनामी आणि रुग्णांची होणारी गैरसोय पाहता सुश्रुत घैसास यांचा राजीनामा घेण्यात आला आहे. घैसास यांचा राजीनामा दीनानाथ रुग्णालय प्रशासनाला सुपूर्द करण्यात आला आहे. डॉ घैसास यांनी तनिषा भिसे प्रकरणात उपचारासाठी अमानत रक्कमेची मागणी केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.

डॉ सुश्रुत घैसास यांनी तनिषा भिसे यांच्या कुटुंबियांकडून १० ते २० लाख मागितल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. आम्ही ३ लाख भरायला तयार होतो. असेही कुटुंबीयांनी सांगितले होते. मात्र रुग्णालयाने ते ऐकले नाही. त्यामुळे महिलेला घेऊन दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये जावे लागले. त्याठिकाणी महिलेचा जीव गेला. या प्रकरणावरून घैसास यांच्यावर टीका होऊ लागली होती. तसेच त्यांना अटक करावी, त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणीही सर्वत्र होऊ लागली होती. आता तर रुग्णालय दोषी असल्याचे पुरावे समोर आले आहेत. अशातच घैसास यांच्यामुळे ते आणखी अडचणीत येण्याची शक्यता आहे. हॉस्पिटल प्रशासनाची होणारी बदनामी आणि रुग्णांची होणारी गैरसोय पाहता त्यांचा राजीनामा घेण्यात आला आहे.

## अमरावती ४२ अंश सेल्सिअस
## पुढील पाच दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अवकाळी पावसाचे सावट दूर होताच पुन्हा एकदा राज्यात तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे. विदर्भातील कमाल तापमानात झपाट्याने वाढ झाली असून आज अमरावती शहरात सर्वाधिक ४२ अंश सेल्सिअसची नोंद करण्यात आली. विदर्भातील इतर बहुतांश शहरांमध्ये देखील कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तर अमरावतीत आज४२ अं.से. तापमान नोंदवण्यात आले.



उन्हाळ्याची सुरुवात यावेळी दरवर्षीपेक्षा लवकर झाली. होळीनंतर साधारणपणे तापमान वाढण्यास सुरुवात होते. यावर्षी फेब्रुवारीच्या मध्यान्हातच तापमानाने चाळीशी गाठली. मार्च महिना संपण्याआधीच कमाल तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले. तर हवामान खात्याने दोनदा उष्णतेच्या लाटेचा इशारा देखील दिला.दरवर्षी विदर्भात सर्वाधिक तापमानाची नोंद होते. यावर्षी देखील मार्च संपण्याआधीच विदर्भात सर्वाधिक तापमान नोंदवले गेले. अवकाळी पावसामुळे गेल्या आठवड्यात तापमानात तब्बल आठ ते दहा अंश सेल्सिअसने घट झाली. मात्र, अवकाळीचे सावट दूर होताच तेवढ्याच वेगाने तापमानात वाढ झाली.

### पुढील पाच दिवस उष्णतेचा तडाखा

काही दिवसातील पावसामुळे असह्य उकाड्यापासून दिलासा मिळाला. मात्र आता कमी दाबाचा पट्टा ओसरला आहे आणि उत्तरेकडून उष्ण वारे येत आहेत. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण वाढले असल्यामुळे राज्यात उष्णतेची लाट पसरली आहे. किमान तापमानही दोन ते तीन अंशाने वाढले आहे. पुढील काही दिवस राज्यात उष्णतेचा तडाखा वाढणार असल्याचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला.

## पुढच्या निवडणुकीपर्यंत उद्धव ठाकरे यांचा पक्षच राहणार नाही : नारायण राणे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७शिर्डी**

विकास, समृद्धी हे उद्धव ठाकरेंचे काम नाही. विरोधकांना शिव्या घालणे अन् चांगल्या कामात विघ्न आणण्याचे काम ते करत असल्याची टीका माजी मुख्यमंत्री व भाजपा खासदार नारायण राणे यांनी शिर्डीत केली. पुढच्या निवडणुकीपर्यंत उद्धव ठाकरे यांचा पक्ष राहणार नाही, असा दावाही राणे यांनी यावेळी केला.



भाजपाचे खासदार नारायण राणे यांनी श्रीरामनवमीनिमित्त सपत्नीक शिर्डीत साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. साई दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांचा समाचार घेतला. विधायक सामाजिक विकासकामांची विचारसरणी उद्धव ठाकरे यांची नाही. ३९ वर्ष मी उद्धव ठाकरेंबरोबर काम केले. बाळासाहेब ठाकरे होते त्यावेळी पक्ष होता. साहेब गेले आणि शिवसेना संपली, असेही राणे म्हणाले.संजय राऊत सकाळी उठल्यावर घराबाहेर मीडियाशी बोलून दुकान चालवतो. संजय राऊतने आपले कर्तृत्व सांगावे. देशासाठी, राज्यासाठी आणि स्वतःच्या गावासाठी काय योगदान आहे. संजय राऊतच्या कुठल्याही भाष्याला मी उत्तर देणार नाही. संजय राऊतला मूर्ख माणूस समजत असल्याचे ते म्हणाले.

**कृषिमंत्री कोकाटे यांचे मत चुकीचे**


कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबद्दल केलेल्या व्यक्तव्यावर बोलताना, कोकाटे यांनी शेतकऱ्यांबद्दल व्यक्त केलेले मत चुकीचे आहे, असेही राणे म्हणाले.

## पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढणार? केंद्र सरकारने एक्साइज ड्युटीमध्ये केली वाढ

### बदल मंगळवारपासून लागू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

एकीकडे महागाईने उच्चांक गाठलेला असताना दुसरीकडे पेट्रोल डिझेलच्या किमतींबाबत मोठी बातमी समोर आली आहे. सरकारने पेट्रोल-डिझेलच्या किंमतीवरील उत्पादन शुल्क वाढवले आहे.



पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, केंद्र सरकारने सोमवारी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याची घोषणा केली. हे बदल मंगळवारपासून लागू होणार आहेत. पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १३ रुपये आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क १० रुपये करण्यात आल्याचे आदेशात म्हटले आहे.उत्पादन शुल्कात वाढ केल्याने किरकोळ किमतींवर काय परिणाम होईल, हे आदेशात सांगण्यात आलेले नाही. परंतु, पीटीआयने उद्योग सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की किरकोळ किमतींमध्ये बदल होण्याची शक्यता कमी आहे. आंतरराष्ट्रीय तेलाच्या किमतीत घट झाल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये आधीच कपात झालेली आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क वाढीचा परिणाम होण्याची शक्यता कमी आहे.

## या वर्षी दहावीचा निकाल १५ मे च्या आधीच लावण्याची बोर्डाची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

मागील महिन्यात म्हणजेच मार्च महिन्यात दहावीची परीक्षा संपली. परीक्षा संपल्याने विद्यार्थी टेन्शन फ्री झाले आहेत. पण, आता विद्यार्थ्यांच्या नजरा निकालाकडे लागल्या आहेत. मागील वर्षी दहावी आणि बारावीचा निकाल लवकर लावण्यात आला होता. या वर्षीही निकाल १५ मे च्या आधीच निकाल लावण्याची तयारी बोर्डाची आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे एसएससी म्हणजे दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरु झाली होती.



मार्च महिन्यात ही परीक्षा संपल्यानंतर आता सर्व विद्यार्थ्यांना निकालाची प्रतिक्षा लागली आहे. शिक्षण विभागाकडून उत्तरपत्रिका तपासणीचे काम सुरू आहे. यावर्षी १५ मे पूर्वीच निकाल लावण्याची तयारी बोर्डाने केल्याचे सांगण्यात येत आहे. पुढे लगेचच ॲडमिशनची प्रक्रिया सुरू होते, त्यामुळे लगेच निकाल लावण्याची तयारी सुरू आहे. विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहे. दरम्यान, जुलैच्या सुरुवातीलाच पुरवणी परीक्षा होणार आहेत. यामुळे निकाल मे महिन्याच्या १५ तारखेपर्यंत निकाल लावण्यात येणार आहे. पण, निकालाची तारीख अजूनही जाहीर करण्यात आलेली नाही.

## अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणात सरकारला दणका, पोलिसांवर गुन्हा दाखल होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मुंबई**

अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणात राज्य सरकारला हायकोर्टाने मोठा धक्का देत या प्रकरणात पोलिसांवार गुन्हा दाखल करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहे. या प्रकरणात अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करणार नाही अशी भूमिका राज्य सरकारने घेतली होती मात्र आता मुंबई हायकोर्टाने दिलेल्या आदेशानंतर पोलिसांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याने राज्य सरकारला एक मोठा धक्का मानला जात आहे.



अक्षय शिंदे याचा मुंब्रा परिसरात चौकशीसाठी आणताना एन्काऊंटर करण्यात आला होता मात्र हे एन्काऊंटर बनावट असल्याचा तपासात समोर आल्याने पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली होती मात्र याच्या विरोधात राज्य सरकारने भूमिका घेत जोपर्यंत एसआयटी अहवाल येत नाही तोपर्यंत गुन्हा दाखल होणार अशी भूमिका सरकारने घेतली होती.

तर दुसरीकडे या सरकारच्या या भूमिकेवर हायकोर्टाने नाराजी व्यक्त करत आज या प्रकरणाचा निकाल देत मुंबई पोलीस सहआयुक्त (गुन्हे) लखमी गौतम यांना संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहे. तसेच या प्रकरणाचा पुढील तपास मुंबई पोलिसांना देण्याचे आदेश देखील हायकोर्टाने दिले आहे. या आदेशानंतर आता पुढील दोन दिवसात या प्रकरणात एसआयटी स्थापन करण्यात येणार आहे आणि स्थापन करण्यात आलेल्या एसआयटीला या प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा लागणार आहे.

## स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा मुंबई हायकोर्टात:एफआयआर रद्द करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबन गाण्याप्रकरणी अडचणीत सापडलेला स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी आता मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेद्वारे त्यांनी मुंबई पोलिसांनी नोंदवलेला एफआयआर रद्द करण्याची मागणी केली आहे.



कामरा यांनी ५ एप्रिल रोजी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यात त्यांनी असा दावा केला आहे, त्यांच्याविरुद्ध नोंदवलेला एफआयआर हा संविधानाने दिलेल्या त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. या प्रकरणाची सुनावणी २१ एप्रिल रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एस.व्ही. कोतवाल आणि न्यायमूर्ती एस.एम. मोडक यांच्या खंडपीठासमोर होईल.

दुसरीकडे कुणाल कामरा तिसऱ्यांदा समन्स बजावूनही मुंबई पोलिसांसमोर हजर झाला नाही. गत २ एप्रिल रोजी त्याला तिसरा समन्स पाठवण्यात आला होता. त्यात त्याला ५ एप्रिल रोजी हजर राहण्यास सांगण्यात आले होते.कुणाल कामरा विरोधात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबन गाण्याविषयी मुंबईतील खार पोलिस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला आहे. कामराने एका स्टँड-अप कॉमेडी शोमध्ये एक विडंबन सादर केले होते, त्यात त्यांनी शिंदे यांचा उल्लेख देशद्रोही असा केला होता.

## दिल्लीतील भाजपा सरकार शीशमहल विकणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७ नवी दिल्ली**

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या शीशमहलवरून भाजपानेदिल्ली विधानसभा निवडणूक चांगलीच गाजवली होती. आम आदमी पक्षाचे सरकार असताना झालेला भ्रष्टाचार, गैरव्यवहार, यमुना नदीची स्वच्छता यासह शीशमहल हा मुद्दा निवडणुकीच्या केंद्रस्थानी होता. भाजपाचा मुख्यमंत्री त्या शीशमहलमध्ये राहायला जाणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले होते. आता त्या शीशमहलचे नेमके काय केले जाणार? दिल्लीतील नव्या भाजपा सरकारचा प्लान काय? याबाबत दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सविस्तर माहिती दिली.

अलीकडेच एका माहितीच्या अधिकारातून शीशमहल संदर्भात नवीन माहिती समोर आली आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी या निवासस्थानाच्या नूतनीकरणासाठी ५२ कोटी रुपये खर्च केल्याचा दावा करण्यात आला होता. यानंतर आता एका माहिती अधिकारातून मागवलेल्या माहितीला उत्तर देताना दिल्ली सरकारने दिलेल्या माहितीनंतर भाजपाने पुन्हा एकदा आम आदमी पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली आहे.

## संपादकीय ......

# थकबाकीचे 'जड ओझे'

गेल्या काही वर्षांत क्रेडिट कार्डवर व्यवहार करणार्यांची संख्या झपाट्याने वाढत चालली आहे. परिणामी, बँकिंग क्षेत्रापुढे खासकरून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना त्यांच्या क्रेडिट कार्ड पोर्टफोलिओमध्ये वाढत्या थकबाकीचे आव्हान निर्माण झाले आहे. रिझर्व्ह बँकेच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ अखेर भारतातील एकूण क्रेडिट कार्ड थकबाकी २.९ लाख कोटी रुपये होती, जी गेल्या वर्षभरात १३ टक्क्यांनी वाढली आहे.

भारतामध्ये डिजिटल व्यवहार वाढत असताना क्रेडिट कार्डचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे; मात्र अनेक लोक नियोजनशून्य खर्च करतात आणि त्यामुळे क्रेडिट कार्ड थकबाकी वाढते. याचा वैयक्तिक अर्थकारणासोबतच संपूर्ण अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. अनेक लोक उधारीवर खरेदी करण्याची सवय लावून घेतात आणि मासिक उत्पन्नाच्या तुलनेत जास्त खर्च करतात. बँका आणि वित्तसंस्था विविध प्रकारच्या कॅशबॅक, डिस्काऊंट आणि रिवॉर्ड पॉईंटस्च्या नावाखाली ग्राहकांना खर्च करण्यास प्रवृत्त करतात. या ऑफर्सचा फायदा घेण्याच्या मोहात लोक गरजेपेक्षा जास्त खर्च करून आर्थिक संकटात अडकतात. क्रेडिट कार्डची पूर्ण थकबाकी वेळेवर भरली नाही, तर ३६ ते ४२ टक्के वार्षिक व्याजदर लावला जातो. याशिवाय लेट पेमेंट फी, ओव्हरड्राफ्ट चार्जेस यामुळे थकबाकी झपाट्याने वाढते. नोकर कपात, वैद्यकीय खर्च, आपत्कालीन परिस्थितीमुळे अनेकांना क्रेडिट कार्डचा वापर करावा लागतो; मात्र व्यवस्थित परतफेडीशिवाय हा खर्च आर्थिक ओझ्यात बदलतो. व्याजदर आणि विलंब शुल्कामुळे थकबाकी सतत वाढत जाते आणि लोक कर्जबाजारी होतात. काही प्रकरणांमध्ये कर्जाची रक्कम उत्पन्नाच्या दुपटीहून अधिक होऊ शकते, ज्यामुळे लोक मानसिक तणावात जातात. थकबाकी जास्त झाली, तर बँक किंवा वित्तसंस्था वसुली एजंट पाठवतात, ज्यामुळे ग्राहकाला मानसिक त्रास सहन करावा लागू शकतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये बँक ग्राहकावर कायदेशीर कारवाई करू शकते.

सप्टेंबर २०२४ अखेर सार्वजनिक बँकांमध्ये क्रेडिट कार्ड थकबाकीचे प्रमाण १२.७ टक्के इतके होते, तर खासगी बँकांमध्ये हेच प्रमाण केवळ २.१ टक्के होते. केअर रेटिंग्सच्या अहवालानुसार सार्वजनिक बँकांनी क्रेडिट कार्ड वितरण अधिक आक्रमकपणे केल्यामुळे त्यांच्यात थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. सार्वजनिक बँका आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी क्रेडिट इतिहास मर्यादित असणार्या ग्राहकांना क्रेडिट देतात. याउलट खासगी बँका मजबूत क्रेडिट प्रोफाईल असलेल्या ग्राहकांवरच भर देतात. रिझर्व्ह बँकेच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ अखेर भारतातील एकूण क्रेडिट कार्ड थकबाकी २.९ लाख कोटी रुपये होती, जी गेल्या वर्षभरात १३ टक्क्यांनी वाढली आहे. संपूर्ण बँकिंग क्षेत्रातील सरासरी क्रेडिट कार्ड थकबाकीचे प्रमाण सप्टेंबर २०२४ अखेर २.२ टक्के होते. सार्वजनिक बँकांकडे एकूण १०९ दशलक्ष क्रेडिट कार्डस्पैकी २४ टक्के कार्डस् आहेत. एसबीआय, बँक ऑफ बडोदा आणि कॅनरा बँकेकडे सार्वजनिक बँकांमधील एकूण क्रेडिट कार्ड थकबाकीच्या ९४ टक्के वाटा आहे. एसबीआय क्रेडिट कार्डस् ही देशातील दुसर्या क्रमांकाची सर्वात मोठा क्रेडिट कार्ड प्रदाता कंपनी असून त्यांच्या ग्रॉस क्रेडिट खर्चाचा दर डिसेंबर २०२४ अखेर ९.४ टक्क्यांपर्यंत वाढला, तर त्याचे ग्रॉस एनपीएचे प्रमाण ३.२ टक्के होते. कोरोनानंतरच्या काळात मोठ्या प्रमाणावर असुरक्षित कर्जे वाटण्यात आली. सप्टेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२३ या काळात फिनटेक कंपन्यांमधील वाढत्या स्पर्धेमुळे सार्वजनिक आणि मध्यम आकाराच्या खासगी बँकांनी आक्रमक कर्जवाटप केले. काही बँकांनी पारंपरिक मेट्रो आणि मोठ्या शहरांच्या पलीकडे जाऊन लहान शहरांमध्येही ग्राहक जोडले. त्यामुळे क्रेडिट स्कोअरची पडताळणी शिथिल झाली. कोरोनाच्या पहिल्या लॉकडाऊनमध्ये थकबाकी वाढल्यानंतर फिनटेक कंपन्यांनी 'बाय नाऊ, पे लेटर' आणि ई-कॉमर्ससाठी 'चेकआऊट फायनान्सिंग' असे नवे क्रेडिट उत्पादन आणले. यामुळे ग्राहकांचे खर्च वाढले; परंतु आरबीआयने फिनटेक कंपन्यांच्या असुरक्षित कर्ज वाटपाला आळा घालण्याचे प्रयत्न सुरू केले.

# भाजप सदस्य नोंदणी अभियानात पोहचला ५०.१८ टक्क्यांवर

## लक्षांक होते ५.३८ प्रत्येक्षात झाली २.७० लाख

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** – भाजपच्या सदस्य नोंदणी अभियानात जिल्ह्याला पाच लाख ३८ हजार सदस्य नोंदणीचे लक्ष असताना भाजप सदस्य नोंदणी अभियानात जिल्हा माघारल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. जिल्ह्यात भाजपचे एक खासदार, पाच आमदार, भाजपच्या राज्य स्टार प्रचारक असतानाही सदस्य नोंदणी अभियानात भाजप पदाधिकारी दोन लाख ६८ हजार सदस्य नोंदणी पूर्ण करू शकले नाही. विशेष म्हणजे जिल्ह्यातील एकाही मतदारसंघाने दिलेले लक्ष पूर्ण केले नाही.

उल्लेखनीय असे की,सहा एप्रिल रोजी भाजपचा स्थापना दिवस आहे. भाजप पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कार्याची दखल ६ एप्रिलनंतर घेतली जाईल.विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या घवघवीत यशानंतर पक्षाचा विस्तार करण्यासाठी संघटनपर्व अंतर्गत राबविण्यात आलेल्या सदस्य नोंदणी मोहिमेला अमरावती शहरासह जिल्ह्यातील तहसील व ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद मिळाला. शहर व जिल्हा ग्रामीण भाजपने जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात तब्बल दोन महिने राबविलेल्या सदस्य नोंदणी अभियानातून चार लाखापेक्षा अधिक सदस्य नोंदणी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती, प्रत्यक्षात एकही विधानसभा मतदारसंघ सदस्य नोंदणीचे लक्ष्य पूर्ण करू



शकला नाही. सुरुवातीला चांगला प्रतिसाद मिळाला असला तरी त्यानंतर मात्र सदस्य नोंदणी अभियान पूर्णतः सोशल मीडियापूरते मर्यादित ठेवल्याचे बोलले जात आहे. त्याचा ही फटका सदस्य नोंदणी अभियानाला बसल्याची शक्यता नाकारता येत नाही.

या संदर्भात भाजपच्या स्थानिक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लोकसभा निवडणुकीच्या वेळी मिळालेल्या मर्यादित यशानंतर विधानसभा निवडणुकीत पक्षाने पूर्ण ताकदीनिशी पुनरागमन केले होते, त्यामुळे जिल्ह्यातील ८ विधानसभा मतदारसंघांपैकी ७जागांवर महायुतीच्या उमेदवारांनी विजय मिळवला होता. ज्यामध्ये भाजपच्या केवळ ५ उमेदवारांचा समावेश होता.अशा स्थितीत विधानसभा निवडणुकीतील नेत्रदीपक विजयानंतर भाजपने पक्षाचा संघटनात्मक विस्तार करण्यासाठी जानेवारी महिन्यापासून संघटना पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी मोहीम राबवण्यास सुरुवात केली. त्याद्वारे अमरावती

| विधानसभा | बुथ | सदस्य नोंदणी |
|---|---|---|
| | | ७५६०० |
| धामणगाव रेल्वे | ३७८ | २३९६२ |
| बडनेरा | ३४५ | २७४४३ |
| अमरावती | ३२२ | ६९००० |
| तिवसा | ३१९ | ६४४०० |
| दर्यापूर | ३४२ | ५६६०७ |
| मेळघाट | ३५६ | ६३८०० |
| अचलपूर | ३०९ | ३६७६६ |
| मोर्शी | ३११ | ६८४०० |

जिल्ह्यातील ८ विधानसभा मतदारसंघात २ लाख ७० हजार १४६ नवीन सदस्यांची नोंदणी करण्यात आली.

### बॉक्सराजकीय पक्षाच्या तुलनेत नंबर वन

भाजप वरिष्ठांनी विधानसभानिहाय दिलेले लक्ष्य जरी भाजप पदाधिकारी पूर्ण करू शकले नाही, तरी अन्य पक्षांच्या तुलनेत भाजप पदाधिकाऱ्यांनी सर्वाधिक नवीन सदस्यांची नोंदणी भाजपमध्ये केल्याचे दिसून येते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा व शिंदे गट तसेच अन्य पक्षाने सदस्य नोंदणी मोहीम सुरू केली, मात्र त्यांचे अभियान कुठे सुरू झाले व किती सदस्य झाले याचा कुणालाच थांगपत्ता लागला नाही. त्या तुलनेत भाजपने सदस्य नोंदणी सुरू केली आणि दोन लाख ७० हजार नवीन सदस्य जोडले.

# शेतकऱ्यांनो उन्हाळी टोमॅटोची पुनर्लागवड करतांना हे काम करा, उत्पन्न दुप्पट मिळवा!

कृषी विशेष

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक** – उन्हाळी हंगामात टोमॅटोची रोपे २५-३० दिवसांची आणि ८-१० सेमी उंचीची झाल्यावर पुनर्लागवड केली जाते. टोमॅटोची रोपे पुनर्लागवड करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी...

**उन्हाळी टोमॅटो पुनर्लागवड**

शेतामध्ये सऱ्या पाडून जमिनीच्या उतारानुसार वाफे तयार करून घ्यावेत.

टोमॅटोची रोपे तयार झाल्यानंतर लागवडीच्या वाफ्यांना आठवड्यापूर्वी पाणी देऊन वाफसा स्थिती ठेवावी.

लागवडीच्या दिवशी वाफ्यांना पुन्हा पाणी द्यावे. वाफ्यांमध्ये पाणी असतानाच ओल्यातच रोपांची लागवड करावी.

पुनर्लागवडीपूर्वी रोपवाटिकेमध्ये साधारणतः एक आठवडा अगोदर पाण्याची मात्रा हळूहळू कमी करावी. म्हणजे रोपे कणखर होतात.

लागवडीसाठी वाफ्यातून रोपे काढण्यापूर्वी एक दिवस आधी वाफ्यांना पाणी द्यावे. त्यामुळे रोपांची मुळे न तुटता रोपे सहज निघतात.

पुनर्लागवडीसाठी २५ ते ३० दिवसांची, १० ते १५ सें.मी. उंच व साधारण ६ ते ८ पाने असलेली रोपे निवडावीत.

लागवडीसाठी योग्य वाढीची सशक्त रोपे निवडावीत. मरगळलेली, इजा झालेली, मुळे कमी असणारी, वाकडे वा

पातळ खोड असणारी तसेच रोगट रोपे पुनर्लागवडीसाठी वापरू नयेत.

पुनर्लागवडीपूर्वी रोपांची मुळे इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) ४ मि.ली. अधिक मेटॅलॅक्झिल एम (३१.८ इएस) ६ ग्रॅम

किंवा कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या द्रावणात १०-१५ मिनिटे बुडवून घ्यावीत.

नर्सरीमधून आणलेल्या रोपांच्या ट्रेमध्येच वरील द्रावणाची आळवणी करावी.

दोन रोपांत साधारण ३० सें.मी. आणि सरीत ९० सें.मी. अंतर ठेवून टोमॅटो रोपांची




लागवड करावी.

रोपे लावताना रोपांच्या खोडावर दाब देऊ नये. नाजूक खोड ताबडतोब पिचल्याने अशी रोपे नंतर दगावतात.

लागवडीनंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी आंबवणीचे पाणी द्यावे.

लागवडीनंतर दहा दिवसांनी मेलेल्या रोपांच्या जागी नवीन रोपे लावावीत.

रबी हंगामातील टोमॅटो पीक फुलोरा अवस्थेत असल्यास खुरपणी करून शेत स्वच्छ करावे व खताची मात्रा द्यावी.

टोमॅटो पिकास आधार देण्याचे काम पूर्ण करावे.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी




# उन्हाळ्यात मुलांची त्वचा का होते कोरडी? जाणून घ्या कारणे

**दि. ७ विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळ्यातील कोरड्या त्वचेमुळे ३ मुलांच्या अंगावर लालसरपणा, खाज सुटणे, त्वचेवर सूज येणे आदी गोष्टी जाणवू शकतात. यामुळे उन्हाळ्यात मुलांना खूप त्रास आणि चिडचिड होऊ शकते. सनस्क्रिन वापरा उन्हाळ्यात बाहेर पडताना पालक आपल्या चेहऱ्यावर आणि शरीरावर सनस्क्रीन लावतात; पण मुलांना सनस्क्रीन लावण्यासाठी विसरतात. मुलांना शाळेत जाताना किंवा खेळायला जाताना सनस्क्रीन लावणे आवश्यक असते. मुलांसाठी केवळ डॉक्टरांनी सुचविलेलेच सनस्क्रिन वापरा. नाही तर ॲलर्जी होऊ शकते.

सैल व सुती कपडे वापरा:

मुलांची त्वचा झाकली जाईल तसेच हलक्या रंगाचे, सैलसर सुती कपडे घाला. हे त्यांच्या त्वचेचे सूर्यापासून संरक्षण करण्यास आणि त्यांना थंड ठेवण्यास मदत करतील.

केसांची स्वच्छता राखा:

अंगाला जसा घाम येतो तसाच उन्हाळ्यात केसांमध्ये घाम येऊन केस ओले होतात. यामुळे खाज येणे, घाम जास्त वेळ राहिला, तर केस चिकट होणे आणि डोक्यात फोड येणे, वास येणे अशा समस्या उद्भवतात. त्यामुळे उन्हाळ्यात केस आठवड्यातून दोन ते तीन वेळा आवर्जून धुवावेत. मुलांना दिवसा घराबाहेर खेळायला पाठवताना डोक्यावर टोपी घालून पाठवावे.

स्वच्छता राखा :

मुलांना आंघोळ घालण्यासोबतच वेळोवेळी त्यांचे हात आणि चेहरा धुवावा. यामुळे मुलांना कोणत्याही प्रकारच्या संसर्ग आणि विषाणूपासून वाचवू शकता.

जास्त पाणी पाजा:

मुलांना संतुलित आहार देणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांची रोगप्रतिकारक



शक्ती कमकुवत होते तेव्हा मुलांना संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. लहान मुलांचे खूप लवकर निर्जलीकरण होते. त्यामुळे मुलाला जास्त पाणी द्यावे आणि त्याला पाणीदार फळे खायला द्यावीत.

घाम पुसत राहावे :

उन्हाळ्यात बाळाला जास्त कपडे घालू नका. सैल कपडे घालावीत. बाळाला काही काळ कपड्यांशिवाय ठेवावे. बाळाच्या त्वचेवर असलेला घाम किंवा तेल स्वच्छ कपड्याने पुसावे.

कोमट पाण्याने अंघोळ घालावी :

लहान मुलांना जास्त गरम पाण्याने आंघोळ घातल्यास त्यांच्या त्वचेचे नुकसान होऊ शकते. मुलांची त्वचा कोरडी होऊ शकते, त्यांना खाज येण्याची तक्रार होऊ शकते. यामुळे त्यांना गरम वाटू शकते, तसेच ताप येण्याची शक्यताही वाढते. म्हणूनच कोमट पाण्याने अंघोळ घालणे योग्य राहील.

# महिला वाहतूक पोलिसांशी हुज्जत घालणाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती–** शहरातील सक्करसाथ स्थित शनिमंदिर भागातील वाहतूक व्यवस्था सांभाळत असताना एका महिला वाहतूक पोलिसांसोबत हुज्जत घालण्यात आली. याप्रकरणी तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी २५ ते ३० वर्षे क्याच्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. तक्रारकर्त्या महिला वाहतूक पोलिस अंमलदार अन्य सहकाऱ्यांसमवेत राजकमल चौकात ड्युटीवर होत्या. दरम्यान त्या काही महत्त्वाचे सामानघेण्यासाठी सक्करसाथ येथील मनीष ट्रेडर्सजवळ येथे गेल्या. त्यावेळी त्या भागात ट्रैफिक जाम लागल्याने त्यांनी तेथील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पुढाकार घेतला. त्या कर्तव्य पार पाडत असताना दोन अनोळखी तरुणांनी त्या महिला पोलिस अंमलदारासोबत वाद करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच त्यांना अश्लील शिवीगाळ करून लोटालोटी केली व त्यांच्या अंगावर धावून गेले. त्यामुळे त्यांनी सहकारी पोलिसांना फोन कॉल करून तेथे बोलावून घेतले.याची प्रकरणाची तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.–

# जिल्ह्यात कुठेही गारपीट किंवा जोराचा पाऊस न झाल्याने पिकांचे नुकसान वाचले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती** रब्बी हंगामातील चणा व गहू पीक काढणीवर असताना तसेच कांदा पीक जोमात असताना पावसासह गारपिटीच्या अंदाजाने शेतकऱ्यांमध्ये धास्ती वाढली होती. मात्र जिल्ह्यात कुठेही गारपीट किंवा जोराचा पाऊस न झाल्याने पिकांचे नुकसान वाचण्यासोबतच शेतकऱ्यांची चिंता मिटली.

खरीप हंगामात सोयाबीन व कापसासह तूर, या मुख्य व नगदी पिकांना खुल्या बाजारात अपेक्षित दर मिळालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. रब्बी हंगामातील चणा व गव्हावर त्याची बरीच भिस्त अवलंबून आहे. या हंगामातील पिके आता काढणीवर आलीआहेत. काही भागातील चणा बाजारातही आला आहे तर गहू या महिन्याच्या



अखेरीस बाजारात येणार आहे. कांदा पीक परिपक्वतेच्या स्थितीत असून तोही लवकरच बाजारात दाखल होणार आहे. यंदा आंबा फळपिकाचे उत्पादन अधिक आहे. पिकांची स्थिती समाधानकारक दिसत असताना हवामानात अचानक बदल झाल्याने शेतकऱ्यांसमोरील चिंता वाढली होती. हवामान खात्याने दोन ते पाच एप्रिल या कालावधीत तुरळक ठिकाणी गारपिटीसह हलक्या मध्यम पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यामुळे बहरलेल्या पिकांना धोका निर्माण झाला होता.

पिके कशी वाचवायची ही चिंता शेतकऱ्यांसमोर उभी ठाकली होती. हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार जिल्ह्यातील काही भागांत तुरळक व हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. या कालावधीत चार मिमी सरासरी पाऊस झाला. मात्र त्याने पिकांचे नुकसान झाले नाही. त्याचप्रमाणे गारपीट कुठेच न झाल्याने पिके वाचली. शेतकऱ्यांना हा मोठा दिलासा मिळाला.वर्ष २०२३ मध्ये मार्च, एप्रिल व मे या पीक कापणीच्या महिन्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावून मोठे नुकसान केले होते. फळपिकांचेही या काळात नुकसान झाले आहे. त्यामुळे यंदाही हवामान खात्याच्या अंदाजाने शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकण्याची वेळ आली होती. ती सुदैवाने टळली असून रब्बों हंगामातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर


# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ७ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# आमदार राणा यांनी बस चालवून केला नवीन गाड्यांचा शुभारंभ

## अमरावती विभागात १५ नवीन बसगाड्या मंजूर





**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती** – आमदार रवी राणा यांनी मतदारसंघात तसेच जिल्ह्यात दौरा करताना एसटी बसगाड्यांची विदारक परिस्थिती दिसून आली होती. त्यांनी मुख्यमंत्री, परिवहन मंत्री यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत अमरावती आगारात १५ नवीन एसटी बस देण्यात आल्या. या नव्या बस गाड्यांचा शुभारंभ आमदार रवी राणा यांनी एसटी बस चालवून केला.अमरावती विभागात १५ नवीन बसगाड्या मंजूर झाल्या असून रविवारी राजापेठ बस स्थानकावरून काही बसगाड्यांचे लोकार्पण करण्यात आले. स्वतः आमदार रवी राणा यांनी बस चालवून सेवेचा शुभारंभ केला. यावेळी एसटी बसमध्ये विभाग नियंत्रक निलेश बेलसरे, आगार मॅनेजर वैशाली भाकरे, सांख्यिकी अधिकारी देशमुखव एसटी कर्मचारी वाहक, चालक उपस्थित होते. युवा स्वाभिमान पक्षाचे कार्यकर्तेदेखील मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. त्यांनी रवी राणा यांच्या समवेत प्रभू रामचंद्र की जय असा जयघोष केला. रवी राणा यांनी यावेळी प्रवाशांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या.आगामी काळात पुन्हा नवीन बसेस मिळणार आहे.या संदर्भात मुंबई येथील मुख्य कार्यालयामधून आमदार रवी राणा यांना पत्र प्राप्त झाले आहे, अशी माहिती रवी राणा यांच्या जनसंपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे. चार दिवसांपूर्वी परतवाडा येथील बसस्थानकावर पाच नवीन बसगाड्यांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी भाजपचे आमदार प्रवीण तायडे यांनी बस चालवून प्रवाशांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला होता.-----

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मिळणार पुस्तके

## समग्र शिक्षा अभियानातून पुस्तकांचे केले नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती–** नव्या



शैक्षणिक सत्रात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती नवी कोरी पुस्तके पडणार आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा तसेच अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानातून पुस्तकाचे नियोजन केले जाणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके मिळण्याचा आनंद वेगळाच असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी पुस्तके देण्याचा प्रयत्न शालेय शिक्षण विभागाकडून सुरू आहे. त्यासाठी बालभारतीकडे पुस्तकांची मागणी नोंदविण्यात आली आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत करून प्रवेशोत्सव साजरा राज्य करून पुस्तके वितरित केली जाणार आहेत. पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी नोंदविली असून विद्यार्थ्यांची पटसंख्याही कळविली आहे.

समग्र शिक्षा अभियानाच्या माध्यमातून अमरावती जिल्ह्यात पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळांमध्ये १ लाख ८६ हजार १४१ विद्यार्थ्यांना ११ लाख २५ हजार ९५८ पुस्तके मिळणार आहेत. समग्र शिक्षा अभियानाच्या माध्यमातून हे नियोजन करण्यात येत आहे. २ महिन्यांच्या अवधीत ही पुस्तके १४ पंचायत समिती शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे सर्व ठिकाणी वितरित केली जाणार आहेत. सरकारी शाळा, जिल्हा परिषद, अनुदानित, सोशल वेल्फेअर, आदिवासी, नगरपालिका शाळेतील पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना ही पाठ्यपुस्तके यंदाच्या शैक्षणिक वर्षात मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

### महागाईत दिलासा

ग्रामीण व आदिवासी भागातील तसेच शहरातील दलित वस्ती व बेघर वस्तीमध्ये पालकांची आर्थिक स्थिती वाईट आहे. वाढत्या महागाईमुळे पालक त्रस्त आहेत. अशावेळी पाल्याच्या शिक्षणाचा खर्च करणे कठीण जाते. दिवसेंदिवस महागाई वाढत असल्यामुळे आता पाठ्यपुस्तके मिळाल्यास पालकांना थोडा आधार मिळणार आहे.

### पालकांची चिंता मिटली

दरवर्षी पहिली ते आठवीमधील शालेय विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक संच दिले जाते. मात्र, पुस्तक संच मिळण्यास उशीर होत असल्याने पालकांना प्रतीक्षा करावी लागत होती. मात्र, यंदा ही चिंता मिटणार आहे. विद्यार्थी संख्येच्या अनुषंगाने पुस्तकांच्या संख्येची मागणी नोंदविली आहे. पुस्तके प्राप्त होताच तालुकानिहाय पुस्तकाचे वितरण कले जाणार आहे.**– डॉ. अरविंद मोहरे, शिक्षणाधिकारी प्राथमिक**

# गीतरामायणाने उजाडली रामनवमीची पहाट

## सकाळचे आयोजनःअमरावतीकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद







विदर्भ प्रजासत्ताक **दि.७अमरावती** – 'सकाळ'च्या संगीतमय गीतरामायणात अमरावतीकरांनी रविवारी रामप्रहरी उत्स्फुर्त प्रतिसाद देत या सोहळ्यात अधिकच रंगत आणली. पहाटेपासूनच अमरावतीकरांनी या अभूतपूर्व सोहळ्यासाठी प्रचंड गर्दी केली. गेल्या १७ वर्षांपासून हा अद्वितीय सोहळा सकाळ माध्यम समूहाच्या वतीने आयोजित करण्यात येतो. काव्य नव्हे, हे अमृतसंचय, अशा शब्दांत ज्याचे वर्णन केले जाते, ते ग. दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून लिहिले गेलेले व संगीतकार सुधीर फडके यांनी स्वरबद्ध केलेले गीतरामायणाचे यंदाही मोठ्या भक्तिभावपूर्ण वातावरणात अमरावतीकरांनी श्रवण केले.श्रीराम, सीता, लक्ष्मण व हनुमान मूर्तीचे पूजन खासदार बळवंत वानखडे, 'सकाळ'च्या विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे, जाहिरात विभागाचे सहायक महाव्यवस्थापक सुधीर तापस, वितरण विभागाचे मुख्य व्यवस्थापक विजय वरफडे, ईसीई इंडियाचे संचालक अमित आरोकर, विलास इंगोले, राजेंद्र महल्ले यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर गीतरामायणाला सुरवात झाली.खापर्डे बगीचा परिसरातील आदर्श शाळेच्या विद्यार्थ्यांनी गीतरामायणाच्या आधी रामरक्षा सादर करून वातावरण भक्तिभावपूर्ण केले. तर विजया स्कूल फॉर एक्सलन्सच्या विद्यार्थ्यांनी रामस्तूती सादर करून या सोहळ्याला चारचांद लावले.हॉटेल महफीलचे संचालक अमर बालकृष्णन व गोपाल मुंदडा यांच्यासह व्यवस्थापक श्री. उरपुडे तसेच त्यांच्या टीमचे या सोहळ्याला भरपूर सहकार्य लाभले. गोपाल मुंदडा यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावून गीतरामायणाची स्तुती केली. हेमंत नृत्य कला मंदीरच्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर नृत्य सादर करून या सोहळ्यात अधिकच रंगत आणली.हॉटेल ग्रॅण्ड महफीलच्या बंधन लॉनवर रामनवमीच्या पहाटे आयोजित या सोहळ्याला अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभाताई खोडके, आमदार संजय खोडके, 'सकाळ'च्या विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक प्रमोद काळबांडे, जाहिरात विभागाचे सहायक महाव्यवस्थापक सुधीर तापस, वितरण विभागाचे मुख्य व्यवस्थापक विजय वरफडे, ईसीई इंडियाचे संचालक अमित आरोकर, मधुसुदन ग्रुपचे संचालक तसेच प्रख्यात समाजसेवक चंद्रकुमार उपाख्य लप्पीभय्या जाजोदिया, विजया स्कूल फॉर एक्सलन्सचे व्यवस्थापक अपूर्व रोकडे, तेजस्विनी रोकडे, रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुरेखाताई ठाकरे, माजी महापौर विलास इंगोले, ॲड. किशोर शेळके, माजी सभापती अविनाश मार्डीकर, डॉ. पंजाबराव देशमुख बँकेचे माजी अध्यक्ष राजेंद्र महल्ले, डॉ. भोजराज चौधरी यांच्यासह अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.गीतरामायणाची प्रस्तूती ईसीई इंडिया यांनी केली, तर मधुसुदन ग्रुप तसेच विजया स्कूल फॉर एक्सलन्सने प्रायोजकत्व स्वीकारले होते. यावेळी ईसीई इंडियाचे संस्थापक अमित आरोकर, अनिकेत तोंडारे, अनामिका तोंडारे, मार्केटिंग मॅनेजर सास्वतो घोष, चिराग पुरोहित, गौरव व्यास, कमलेश पुसदकर, चेतन कनाते, सूरज कचवे, किशोर माहुरे तसेच संपूर्ण ईसीईची टीम उपस्थित होती.कार्यक्रमाला रायसोनी विद्यापीठाचे डॉ. नितीन मांडवगडे, अनिल मानकर, शेखर भोयर, प्रीती गावंडे, सुनील केने, ॲड. चंद्रकांत कराळे, रविंद्र लाखोडे, भय्या आवारे, अरुण जोशी, विशाल तिजारे, विनिता हरणे, मोहन अटाळकर, पीयूष गावंडे, संजय पाखोडे, प्रदीप सोजतिया, संजय नागरे, भूषण जोशी, राजू मुकवने, सरपंच संघटनेचे अध्यक्ष गजानन बोंडे, शशांक नागरे, आर्किटेक्ट अनुपम चवात, अनिल लळे, गोपाल राजूरकर, रवी वानखडे, संदीप इंगळे, आशिष कपले, राजेश दहिवाले, सचिन चाळीसगावकर, अश्विनकुमार वाजपेयी, तेजस मांडूळकर, डॉ. धीरज लखोटिया, डॉ. स्वाती लखोटिया, डॉ. स्नेहल निवाने–थेटे, प्रा. विनोद अढाऊ, नितीन कडू, फार्मासिस्ट भारती मोहोकार, रवींद्र पाठक, 'सकाळ'चे मुख्य विक्रेता विक्रम आजबे, राधेश्याम शुक्ला यांच्यासह हजारो अमरावतीकर उपस्थित होते.

# अमरावती भारतीय जनता पार्टी च्या वतीने स्थापना दिवस साजरा

## अमरावती शहराध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी केले ध्वजवंदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती** भारतीय जनता पार्टी स्थापना दिना निमित्त आज राजापेठ येथील भाजपा कार्यालय येथे भाजपा अमरावती शहर अध्यक्ष श्री प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते व शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले.भारतीय जनता पक्ष हा देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असून मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी देशाचे नेतृत्व करत असून महाराष्ट्राचे नेतृत्व आमचे लाडके मुख्यमंत्री श्री देवेंद्र जी फडणवीस साहेब करत आहे. यांच्या सक्षम नेतृत्वात भारत देश जगात एक नंबर बनेल असे प्रतिपादन यावेळी श्री प्रविण पोटे पाटील यांनी केले तसेच पक्षासाठी अहोरात्र झटणाऱ्या , समर्पित भावनेने पक्षासाठी काम करणाऱ्या भाजपा अमरावती शहरातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना भाजपा स्थापना दिनानिमित यावेळी त्यांनी शुभेच्छा दिल्या...यावेळी अमरावती शहर चे भाजपा पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते



# मेळघाटात नव्याने चार तर परतवाड्यात आणखी एका पोलिस ठाण्याचा प्रस्ताव

## जिल्ह्यात ५ नवीन पोलिस ठाणे निर्मितीसाठी एसपींचा पुढाकार,चां.बाजाराला ही मिळणार एसडीपीओ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

मेळघाटचे भौगोलिक क्षेत्र प्रचंड मोठे आहे. दळणवळणाच्या साधनांचा अभाव आणि रस्त्यांची स्थिती लक्षात घेता मेळघाटातील अनेक गावकऱ्यांना पोलिस ठाण्यात यायचे झाल्यास प्रचंड त्रास होतो. दरम्यान यावर तोडगा काढण्यासाठी मेळघाटात चार नवीन पोलिस ठाणे, परतवाडा शहराची व्याप्ती लक्षात घेता या ठिकाणी आणखी एक पोलिस ठाणे असे एकूण पाच नवे पोलिस ठाणे निर्माण करण्याचा प्रस्ताव पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी गृह विभागाकडे पाठवला आहे. मेळघाटात सध्या चिखलदरा आणि धारणी असे दोनच पोलिस ठाणे आहेत. दरम्यान या दोन्ही ठाण्यांच्या हद्दीत असलेल्या काही गावांचेअंतर ठाण्यांपासून ८० ते ९० किमीपर्यंत आहे. या अंतरासोबतच दळणवळणांच्या साधनांचा आणि मार्गाचा अभाव असल्यामुळे संबंधित गावकऱ्यांना पोलिस ठाणे गाठाण्यासाठी अख्खा दिवस प्रवास करावा लागतो, अशी स्थिती आहे.याअडचणींमुळे



पोलिसांची मदत मिळण्यासाठी उशीर होतो. अशावेळी गावकऱ्यांना सोईचे व्हावे म्हणून त्यांच्या गावापासून कमी अंतरावर पोलिस ठाणे असावे आणि त्यांना पोलिसांची मदत तत्काळ मिळावी, या उद्देशाने चिखलदरा ठाण्याचे विभाजन करून काटकुंभ आणि टेंब्रुसोडा तसेच धारणी ठाण्याचे विभाजन करून हरिसाल आणि सुसर्दा या गावांमध्ये नवीन पोलिस ठाणे प्रस्तावित केले आहे. हे चार ठाणे नव्याने झाल्यास मेळघाटात चिखलदरा, धारणीसह सहा पोलिस ठाणे होतील. याचवेळी परतवाडा शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता सध्या असलेल्या एका ठाण्यावर भार येतो आहे. त्यामुळे परतवाडा ठाण्या व्यतिरिक्त परतवाडा ग्रामीण असे नवीन ठाणे प्रस्तावित केले आहे.अचलपूर शहर हे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने संवेदनशील मानले जाते. त्यामुळेच या ठिकाणी स्वतंत्र अप्पर पोलिस अधीक्षक हे पद निर्माण करावे, असाही प्रस्ताव पाठवला आहे. अचलपूर अप्पर पोलिस अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रात दर्यापूर, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, धारणी आणि चांदूर बाजार उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय राहतील. याचवेळी चांदूर बाजार येथे नव्याने उपविभागीय पोलिस अधिकारी हे पद निर्माण करण्यात यावे, असाही प्रस्ताव पोलिस अधीक्षकांनी गृह मंत्रालयाकडे पाठवला आहे. जिल्ह्यात ६ पोलिस चौकी निर्मितीचा प्रयत्न : ठाण्यांच्या हद्दीतील मोठे किंवा संवेदनशील असलेल्या गावात पोलिस चौकी 'आऊटपोस्ट' तयार करण्याबाबत ही प्रस्तावित केले आहे. शिरखेड च्या हद्दीतील नेरपिंगळाई, शिरजगाव हद्दीत करजगाव, आसेगाव हद्दीत असदपूर, खल्लारा हद्दीत कोकर्डा, कूडच्या हद्दीत राजुरा बाजार, मोर्शीच्या हद्दीत हिवरखेड आणि शेंदुरजना घाटच्या हद्दीत पुसला या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आले आहे.

### प्रस्ताव पाठवला आहे



अचलपूर येथे अप्पर पोलिस अधीक्षक आणि चांदूर बाजार येथे उपविभागीय पोलिस अधिकारी दर्जाचे पद निर्माण करणे, यासाठी प्रस्ताव पाठवलेला आहे. यासोबतच जिल्ह्यात सहा आऊटपोस्ट निर्माण करण्यात याव्यात, असाही उल्लेख प्रस्तावात आम्ही केला आहे. **–विशाल आनंद,** पोलिस अधीक्षक.

# जिल्हा परिषदेचा पुढचा अध्यक्ष भाजपचाच होईल

## खा.अनिल बोंडे यांचे मोठे विधान,येवद्यातून विक्रमी मताने कमळ फुलेल, भाजपा आमदारांचा सत्कार समारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ दर्यापूर :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ८० कोटी नागरिकांना घरकुलाचा लाभ दिला. किसान सन्मान योजना, मोफत रेशन, प्रत्येक घरापर्यंत पाईपलाईनद्वारे पाणी, शौचालयाची योजना देऊन सर्वसमावेशक विकास केला. विकास करताना त्यांनी कधीच जात पाहिली नाही. केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार ऐतिहासिक कामगिरी करत आहे. त्यामुळे जनता जनार्दन या कामगिरीवर समाधानी असून अमरावती जिल्हा परिषदेचा पुढचा अध्यक्ष हा भाजपचाच होईल असे स्पष्ट मत खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी तालुक्यातील येवदा येथे व्यक्त केले. तर येवदा जिल्हा परिषदेतून सुद्धा भाजपचे कमळ




विक्रमी मताने फुलल्याशिवाय राहणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार समारंभ शनिवारी (ता.५) आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला डॉ.वसुधा बोंडे, आमदार प्रतापदादा अडसड, आमदार राजेश वानखडे, आरती वानखडे, छायाताई दंडाळे, माजी आमदार रमेश बुंदिले, मोहन जाजोदिया, राजेश मुंदडा, कमलजीत कौर, विधानसभा अध्यक्ष गोपाल चंदन, मदन बायस्कार, उमेश भोंडे, रवींद्र ढोकणे, सरपंच अमानुल्ला खा, नकुल सोनटक्के, किसान मोर्चाचे उपाध्यक्ष संजय वाघमारे, मलाताई डोईफोडे, महिला मोर्चाच्या शाखाप्रमुख छायाताई टोलमारे, किरण देशमुख, मनोज पाथरकर, युवा मोर्चाचे अध्यक्ष मयूर वांदे, संजय पाठक, कीर्ती बघेले, विशाल माहूलकर, ऋषिकेश इंगळे, वसंत रेवस्कर यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान बोलताना डॉ.अनिल बोंडे म्हणाले की, अमरावतीत भाजपचे पाच आमदार निवडून आले आहेत. दर्यापुरात भाजपचा आमदार नसल्याने या मतदारसंघाच्या विकासाची संपूर्ण जबाबदारी माझी आहे. रस्ते, पाणी शौचालय, घरकुल, ग्रामीण मार्ग, राज्य मार्ग, देवस्थानांचा कायापालट यासह संपूर्ण सोयी सुविधा या भागात विकसित करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही ते म्हणाले.

# पंढरपूर येथून बोलेरो गाडीची चोरी करणारा चोरटा अमरावतीतून अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** मूर्तिजापूर अकोला येथील मूळ रहिवासी असलेल्या चोरट्याचे सध्या वास्तव्य अमरावतीला आहे. या चोरट्याने थेट सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथून बोलेरो गाडी चोरून विक्री केली होती. परंतु, पंढरपूर पोलिसांनी विविध पद्धतीने तपासाची चक्रे फिरवून मूर्तिजापूर शहर पोलिसांच्या सहकार्याने सदर चोरट्यास शिताफीने अमरावती येथून अटक करून गजाआड केले. तसेच चोरट्याने विक्री केलेली बोलेरो गाडी ताब्यात घेण्यात आली. याबाबत प्राप्त माहितीनुसार, पंढरपूर येथील शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीतून १ मार्च २०२५ रोजी एक बोलेरो गाडी चोरीस गेली होती. तिच्या शोधात पंढरपूरच्या पोलिस पथकाने १ एप्रिल २०२५ च्या रात्री मूर्तिजापूर शहर पोलिस स्टेशन गाठले. ठाणेदार जाधव यांच्या सहकार्याने पंढरपूर पोलिसांनी मूर्तिजापूर येथील एका संशयितावर संशय व्यक्त केला होता. परंतु, तपासात त्याचा या प्रकरणात कुठलाही सहभाग नसल्याचे आढळून आल्याने त्याला सोडून देण्यात आले. त्यानंतर पंढरपूर येथून आलेल्या पोलिस पथकातील पोलिस प्रसाद औटी, गोडसे, विनोद पाटील तसेच मूर्तिजापूर येथील सपोनि भांगे, पोलिस सुरेश उर्फ मुन्ना पांडे, जीवन अंभोरे, गजानन खेडकर, सचिन दुबे, मंगेश विल्हेकर यांनी रात्रीतून अमरावती गाठले. मिळालेल्या माहितीवरून शिताफीने चोरट्यास ताब्यात घेण्यात आले. तसेच त्याने विक्री केलेल्या ठिकाणाहून बोलेरो गाडी ताब्यात घेतली. यावेळीआरोपी महंमद मुदस्सीर महंमद युनूस (वय २८, रा. उत्तमचंद प्लॉट, तारफैल अकोला, सध्या वास्तव्य अमरावती) याने केला असल्याचे निष्पन्न झाले. जीप पोलिस स्टेशनला आणून जप्त करण्यात आली. ही कामगिरी पंढरपूर ठाणेदार विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि आशिष कांबळे आदींनी पार पाडली आहे. एक महिना तपासाची चक्रे फिरवून घेतला शोध पंढरपूर शहर पोलिसांनी तब्बल एक महिना तपासाची चक्रे फिरवून चोरट्यास गजाआड करण्याची ही कामगिरी पार पाडली. पंढरपूर शहरामध्ये श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांची चार चाकी महिंद्रा कंपनीची पांढऱ्या रंगाची बोलेरो प्लस जीप (एम.एच.११-ए.के. २१९८) चोरीस गेल्याने पंढरपूर शहर पोलिस स्टेशनला भा.न्या.सं. २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# मोलमजुरीसाठी बहिणीकडे आलेल्या २६ वर्षीय तरुणाचा कुलरच्या शॉकने मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७तिवसा –** तिवसा शहरातील आनंदवाडी परिसरात एक दुर्दैवी घटना घडली. येथे एका २६ वर्षीय तरुणाचा कुलरच्या विद्युत धक्क्याने मृत्यू झाला. मृत तरुणाची ओळख मंगेश अशोक डरडे (रा. घोगरा, ता. नरखेड, जि. नागपूर) अशी झाली आहे.

मंगेश गेल्या तीन महिन्यांपासून आनंदवाडी येथे त्याच्या बहिणीच्या घरी मोलमजुरी करत होता. रविवार, ६ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता तो कामावरून घरी परतला. घरी आल्यानंतर त्याने कुलर चालू केला असता त्याला विजेचा जोरदार धक्का बसला.कुटुंबीयांनी त्वरित त्याला तिवसा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. मंगेश हा कुटुंबाचा कर्ता होता. त्याच्या अकाली निधनाने त्याच्या आई-वडिलांसह मोठ्या आप्त परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.आनंदवाडी



परिसरात या घटनेमुळे शोककळा पसरली आहे. मंगेश नेहमीप्रमाणे त्याच्या भावाजोबत ट्रॅक्टरवर मोलमजुरीसाठी जात असे. त्याच्या अकाली जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# १ कोटी २० लाखाचा गांजा नष्ट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** अमरावती शहर पोलिस आयुक्तालयातील विविध पोलिस स्टेशनला एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अंतर्गत दाखल असलेल्या एकूण ६७ गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला आणि पोलिस आयुक्तालयातील केंद्रीय गोदामात ठेवलेला ५९७.०७९ किलोग्राम १ कोटी १९ लाख ४० हजार रुपये किंमतीचा गांजा ४ एप्रिल रोजी महाराष्ट्र एनवायरो पावर लिमिटेड, बुटीबोरी एमआयडीसी, जि. नागपूर या ठिकाणी नेउन इंसिनेटरच्या मदतीने जाळून नष्ट करण्यात आला.

यामध्ये अमरावती शहर पोलिस आयुक्तालयातील सन १९९९ पासून दाखल असलेल्या पोलिस ठाणे नागपुरी गेट येथील ४३ केसेस, पोलीस ठाणे बडनेरा येथील ८ केसेस, पोलीस ठाणे गाडगेनगर येथील ६ केसेस, पोलीस ठाणे खोलापुरी गेट येथील ४ केसेस, पोलीस ठाणे राजापेठ येथील ३ केसेस व पोलीस ठाणे सिटी कोतवाली येथील ३ केसेस याप्रमाणे एकूण ६७ केसेस समाविष्ट होत्या.

सदर केसेसचा न्यायालयीन निकाल लागलेला असल्याने या केसेसमधील गांजा नाश करण्याकरिता पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, यांच्या आदेशाने पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त कल्पना बारवकर, गुन्हे शाखा सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांची त्रिसदस्यीय ड्रग डिस्पोजल कमेटी स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचेकडून सदर गांजा नाश करण्याकरिता परवानगी प्राप्त करण्यात आली असता त्यांनी महाराष्ट्र एनवायरो पावर लिमिटेड, बुटीबोरी एमआयडीसी, जि. नागपूर या ठिकाणी सदर गांजा नाश करण्याची परवानगी दिली होती.त्याप्रमाणे संपुर्ण ६७ केसेसमधील गांजा त्या ठिकाणी नेऊन ड्रग डिस्पोजल कमेटी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, महाराष्ट्र एनवायरो पावरचे मॅनेजर, दोन पंच व आणि पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांचे समक्ष कंपनीमध्ये इंसिनेटरच्या मदतीने गांजा जाळून नष्ट करण्यात आला.

ही कार्यवाही पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर, सहाय्यक पो. निरीक्षक योगेश इंगळे सहायक उपनिरीक्षक कैलास सानप, कर्मचारी अजय मिश्रा, सुधीर गुडधे, अजय निस्ताने, नईम बेग, विशाल वाकपांजर यांनी केली.

# १३ वर्षांत ६० हजार मुलींना आत्मरक्षणाचे धडे

## थांगता मार्शल आर्ट प्रशिक्षक धुळधर यांचा नि:शुल्क उपक्रम; महिलांचा प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** विद्यार्थिनी, युवतीच नव्हे तर महिलांवर अत्याचार, छेड काढणे, विनयभंग, त्रास देणे अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे. आयुष्यात कधी एखादा बिकट प्रसंग येऊ शकतो, अशा वेळी प्रसंगावधान राखून स्वत:चा बचाव कसा करायचा याचे अगदी सोपे धडे थांगता मार्शल आर्ट प्रशिक्षक महावीर धुळधर यांनी १३ वर्षांआधी देण्यास सुरुवात केली. त्यांनी आजवर जिल्ह्यातील ६० हजारांवर युवती, महिलांना नि:शुल्क आत्मरक्षणाचे धडे दिले आहेत. याचा काहींनी वापरही केला आहे. एका १९ वर्षीय युवतीने आत्मरक्षणाचे धडे घेतल्यानंतर ४ महिन्यांनी ट्रेनमध्ये प्रवास करत असताना तिची काही टवाळखोरांनी छेड काढल्यानंतर त्यांना धडा शिकवत त्यांना रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले होते. आत्मरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा उद्देश केवळ धाडस दाखवणे नव्हे तर प्रसंगावधान तसेच वेळ निभावून नेण्याचे कसब होय. बरेचदा एका तरुणीला पाच ते सहा टवाळखोरांचा सामना करणे शक्य होत नाही. अशा वेळी तिने कशाप्रकारे समयसूचकता दाखवावी. स्वरक्षण करावे,



याबाबत पूर्ण प्रशिक्षण २०१२ पासून थांगता असोसिएशनद्वारे दिले जात आहे. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ हेच यातून आम्ही शिकवत असतो. परंतु, कोणी अंगावर चालून येण्याचा प्रयत्न करत असेल तर स्वत:चे रक्षण करण्याइतपत सज्जता असावी, या उद्देशानेही विद्यार्थिनी, युवती, महिलांना आम्ही तयार करतो. सर्वच दृष्टीने विचार करून आत्मरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आहे. हाती असलेली पर्स, पेन, स्केल, दुपट्टा तसेच शूज, चपलेचाही वापर स्वरक्षणासाठी करता येतो, असे धुळधर यांनी सांगितले.

सामाजिक जाणिवेतून घेतला निर्णय उत्तम थांगता खेळाडू घडवण्यासोबतच महिलांना आत्मरक्षणासाठी सज्ज करण्याचा निर्णय १३ वर्षांपूर्वी सामाजिक जाणिवेतून घेतला. कोणत्याही विद्यार्थिनी, महिलांना समाजात वावरताना कठीण प्रसंगाला कधी सामोरे जावे लागले तर निदान त्यातून त्यांनी सहिसलामत बाहेर पडता यावे, एवढी तयारी आत्मरक्षणाच्या धड्यांमधून केली जाते. 'हाजिर सो वजिर' यानुसार हाती ऐनवेळी जी वस्तू असेल तिचा रक्षणासाठी वापर कसा करावा, याबाबत प्रशिक्षण दिले जाते.

# वक्फ कायद्यावरून मविआत फूट ?

## सुप्रीम कोर्टात जाण्यास उद्धव ठाकरेंचा स्पष्ट नकार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मुंबई –** दोन दिवस दिवसभर वादळी आणि प्रदीर्घ चर्चा केल्यानंतर अखेरीस वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक आधी लोकसभेत आणि त्यानंतर राज्यसभेत मंजूर करण्यात आले. या विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची सही झाली. त्यामुळे हा आता कायदा बनला आहे. यावरून विरोधक आणि सत्ताधारी यांच्यावर आरोप-प्रत्यारोप सुरूच असल्याचे पाहायला मिळत आहे. यातच आता वक्फ कायद्यावरून महाविकास आघाडीतील घटक पक्षांपेक्षा उद्धव ठाकरे यांनी वेगळी भूमिका मांडली आहे. त्यामुळे आता विरोधकाच्या महाविकास आघाडीच्या एकतेबाबत पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्याचे सांगितले जात आहे.

वक्फ सुधारणा विधेयकाच्या घटनात्मक वैधतेला आम आदमी पक्षाचे (आप) आमदार अमानतुल्ला खान यांच्यासह असोसिएशन फॉर दी सिव्हिल राईट्स (एपीसीआर) या स्वयंसेवी संस्थेने स्वतंत्र याचिकांद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. याआधी काँग्रेसने व एआयएमआयचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही सदर विधेयकाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यासंदर्भात उद्धव ठाकरे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. यावर बोलताना उद्धव ठाकरे यांनी न्यायालयात जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. वक्फ बोर्डावर आम्ही आमची भूमिका मांडली आहे. काँग्रेसला जायाचे असेल तर जाऊ द्या. आम्हाला जे सांगायचे होते ते मी सांगितले.

# लिंबाची आवक कमी मागणीत वाढः भावात आली तेजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने भाजीपाला बाजारात लिंबाचे भाव वाढताना दिसून येत आहेत. दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की लिंबाचा तोरा वाढतच असतो. उन्हाळ्यात शारीरिक एनर्जी वाढवण्यासाठी अनेक जण लिंबू पाणी किंवा सरबताला प्राधान्य देतात. काहींना जेवताना लिंबूची फोड लागतेच. त्यामुळे लिंबाचे दर वाढले असून मेपर्यंत तेजी राहणार, असे विक्रेते सांगतात. त्यातच एपीएमसी भाजी मंडईत लिंबाची आवक कमी झाल्याने दर वाढल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात येत आहे. त्याचा फटका किरकोळ बाजाराला बसू लागला आहे. दोन लिंबाची किंमत आठ ते १० रुपये इतकी झाली आहे. तीदेखील लिंबूच्या आकारानुसार ठरवली जाते.

शहराच्या होलसेल मार्केटमध्ये दररोज ४०० ते ५०० क्विंटल लिंबाची आवक होत आहे. उन्हाळ्यात उष्णतेचे प्रमाण अधिक असते. त्यामध्ये घाऊक बाजारामध्ये ४०० ते ६०० रुपये १०० नग अशी किंमत वाढ झाली आहे. एक लिंबू पाच ते सहा रुपयांना मिळत असून, किरकोळ बाजारात तर १० रुपयाला २ तसेच १५ रुपयांना तीन नग किंमत दिसून येत आहे. त्यामध्येही आकारानुसार व्यापारी किंमत सांगतात.

गेल्या महिन्यापर्यंत दोन ते तीन रुपयांना एक किंवा १० रुपयांत चार ते पाच असा भाव असणाऱ्या लिंबाची आता मागणी वाढली आहे. तुलनेने बाजारात पुरवठा कमी असल्याने या लिंबांचा भाव



थेट १० रुपयांना दोन झाला आहे. प्रामुख्याने सरबत, सोडा, उसाचा रस यामध्ये लिंबाचा वापर केला जातो. त्यातच मागील आठवड्यापासून उन्हाच्या झळा वाढल्या आहेत. त्यामुळे आपसूकच थंड पेयांची मागणी वाढली आहे.

सध्या किरकोळ बाजारात १० रुपयांना २ आणि १५ रुपयांना तीन याप्रमाणे लिंबू मिळत आहे. नेहमीच्या आहारात लिंबाची फोड आवर्जून घेतली जाते. वरणात टोमॅटो ऐवजी लिंबाचा वापर केला जातो. तसेच उन्हाचा पारा वाढू लागल्याने लिंबू सरबत, उसाच्या रसात देखील वापर होत आहे. याचबरोबर लिंबाचे लोणचेही केले जाते; मात्र भाजी मंडईत लिंबू भाव खाऊ लागला आहे. काही दिवसांपूर्वी २० रुपयांना सहा लिंबू मिळत होते मात्र आता भाववाढ झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे किमती अधिक झाल्या असल्या तरी उष्णतेचा दाह कमी करून आरोग्याची काळजी घेणाऱ्या लिंबाला ग्राहकांकडून पसंती दिली जात आहे.

# नया अकोला चांदूरबाजार महामार्गावर असलेल्या वाळलेल्या निंबाच्या झाडांना भिषण आग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

नया अकोला चांदुरबाजार महामार्गावर असलेल्या दोन वाळलेल्या निंबाच्या झाडांना भिषण आग लागली हि संपूर्ण घटना शनिवार ५ एप्रिल रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास घडली आहे हि आग इतकी भिषण होती की वलगाव नया अकोला चांदूरबाजार महामार्गावरील वाहतूक एक तास ठप्प झाली होती हि सर्व घटना वलगाव पोलिसांना माहित पडताच त्यांनी अग्निशामक विभागाला माहिती दिली अग्निशामक दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी पोहोचले व आगीवर मोठा पाण्याचा वापर करून आग आटोक्यात आणली



अश्यातच वलगाव नया अकोला चांदूरबाजार महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाळलेली निबांची आहे गेल्या अनेक वर्षांपासून हि निबांची झाडे कापल्या गेली नाही आता मात्र हि निबांची झाडे धोकादायक ठरत आहे-

विदर्भ प्रजासत्ताक

# अमरावतीसह राज्यातील १०२५ न्यायाधीशांच्या बदल्या;उच्च न्यायालयाचे आदेश

## सत्र न्यायाधीश २२२, दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर ३३१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ४७२ न्यायाधीशांचा समावेश : अमरावतीमधून ३१ न्यायाधीशांच्या बदल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

मुंबई उच्च न्यायालयाने अमरावतीसहराज्यातील एकूण १०२५ न्यायाधीशांच्या वार्षिक बदल्यांचे आदेश काढले आहेत. यामध्ये सत्र न्यायाधीश २२२, दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर ३३१, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ४७२ न्यायाधीशांचा समावेश आहे. या अंतर्गत अमरावतीमधील सत्र न्यायाधीशांचा विचार केल्यास ६ न्यायाधीशांच्या जिल्ह्यातून बदल्या झाल्यात, तर २ न्यायाधीश अमरावतीमध्ये बदलीने आले आहेत.

राज्यात एकूण २२२ सत्र न्यायाधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये अमरावतीचे सत्र न्यायाधीश एस.डी. ठाकरे यांची स्मॉल कॉजेस्कोर्ट मुंबई येथे बदली झाली आहे. तर परभणी कौटुंबिक कोर्टाचे न्यायाधीश एच.बी. शेळके हे अमरावतीत बदलून आले आहेत. वरुडचेसत्र न्यायाधीशए.एस. आवटेयांची उस्मानाबाद येथे बदली झाली. तर अमरावती न्या.पी.एन.रावयांचीसिटीसिव्हील कोर्ट मुंबई येथे बदली झाली आहे. मुंबई कौटुंबिक न्यायालयाचे न्या.पी.पी. बनकर यांची अमरावतीत बदली झाली आहे. अमरावती सिटी कोर्टचे न्या. सचिन सूर्यकांत पाटील यांची तसेच न्या. पी.ए. साबळे या दोघांची बदली मुंबईला झाली आहे. अमरावतीचे न्या. आर. आर. पोंडकुले यांची बदली फॅमिली कोर्ट मुंबई येथे झाली आहे.दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तरावरील ३३१ न्याधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहे. यामध्ये अमरावतीमधून १२ न्यायाधीशांची बदली झाली, तर ८ न्यायाधीश हे अमरावतीमध्ये बदलीने आले आहेत. यात अमरावतीमधून न्या.पी.डी.झांबरे यांची औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, न्या.पी.पी.देशमाने यांची ठाणे जिल्ह्यातील बेलापूर, न्या.ओ.एस. पाटील यांची दर्यापूर येथून सोलापूर, न्या.जी.ए. देशपांडे यांची पुणे जिल्ह्यातील दौंड कोर्टात बदली



झाली आहे. तर न्या.पी.डी.सावंत आणि न्या. आर.पी.यादव , न्या. मेघा ए. देशमुख आणि न्या. आर.टी. घोगले यांची बदली करण्यात आली, मात्र त्यांच्या बदली स्थळाबाबत निर्णय राखून ठेवण्यात आला आहे. अमरावतीचे न्या.एम.आर.यादव यांची लेबरकोर्ट मुंबई, न्या.एन.एन. भेंड यांची जेएम (फस्ट क्लास) मुंबई, अचलपूरचे न्या. एस. आर. भोर यांची लेबर कोर्ट ठाणे, न्या. नेहा एन. जोशी यांची स्मॉल कॉजस् कोर्ट मुंबई येथे बदली करण्यात आली आहे. तसेच दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तरावरील ८ न्यायाधीश अमरावतीत बदलीने येणार आहेत. यामध्ये चंद्रपूरचे न्या.ए.डी. रामटेके, जळगावचे न्या. सी. आर. बलवानी, अंधेरी मुंबईचे न्या.जे. डब्ल्यु. गायकवाड, मुंबईचे न्या.ए.एच. बेग, पुण्याचे न्या. एच.जे. शेंडे, निफाड (नाशिक) चे न्या. ए. एल. सराफ, पुणे जिल्ह्यातील दौंडचे ए. एम. जोशी, बीडचेन्या. विशाखाबी. पाटील यांची बदली अमरावतीत झाली आहे.

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तरावरील ४७२ न्याधीशांच्या बदल्या करण्यात आल्या आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यात १३ न्यायाधीशांची बदली झाली, यातील एक वरुडचे न्यायाधीशांची अमरावतीत बदली झाली. यामध्ये अचलपूरचे न्या. एस.एस. मांजरेकर यांची असीस्टंट चॅरीटी कमिश्नर सातारा, मोर्शीचे न्या. राजेश बी. खंडारे यांची ठाणे, अंजनगावचे न्या. एस.एम. जाधव पुणे, वरुडचे न्या. न्या.एस.पी. लंकेश्वर यांची असीस्टंड चॅरिटी कमिश्नर नागपूर, अंजनगावचे एस.आर. जाधव यांची सांगली जिल्ह्यातील मिरज, अमरावतीचे न्या. जे. के. चैनानी यांची अहमदनगर, तिवसाचे न्या. व्ही.एच. शेंडे यांची गोंदिया, अमरावतीचे न्या. शीतल कोऊल यांची नांदेड येथे बदली झाली आहे. अचलपूरचेन्या.एस.एस. म्हातारमारे, चांदुर बाजारचे न्या.पी.एम. चव्हाण यांची बदली झाली, पण ठिकाणाबाबत निर्णय राखून ठेवण्यात आला आहे. धारणीचे न्या. आय. जी. महादेवकोळी यांची सातारा, चांदुर रेल्वेचेन्या. के. व्ही. शेंडेयांची गोंदिया आणि वरुडचे न्या.ए. बी. काटे यांची अमरावतीत बदली झाली आहे. तसेच १८ न्यायाधीश बाहेरून अमरावतीमध्ये बदलीने आले आहेत. यामध्ये बीडचे न्या. एस.टी.सहारे, कोल्हापूर गडहिंग्लजचे न्या.एस.ए.राठोड-चांदुर रेल्वे, कल्याणचे न्या.पी.बी.तौर यांची असीस्टंट चॅरिटी कमिश्नर अमरावती, ठाणेचे न्या.एन.एल. गायकवाड, मुल. (चंद्रपूर) चे न्या. एस.डी. कमलाकर यांची दर्यापूर, दौंडचे न्या. एस. बी. काळदाते, हिंगोलीचे न्या. आय. जे. ठाकरे यांची वरुड, भुसावळचे न्या.व्ही. बी. साळुंके यांची अचलपूर, भोकरदन (जालना) चे न्या.सी.एस.देशपांडे यांची अमरावती, सातारा खंडाळाचे न्या. के.ए. पट्टेबहादूर यांची सहकार कोर्ट अमरावती, पालम (परभणी) चे न्या.एन.एम. रेड्डी यांची अचलपूर, सांगलीचे न्या.एस.बी. बहीरत यांची अंजनगाव, येवलाचे न्या.एस.बी.राठोड यांची अंजनगाव, इस्लामपूरचे न्या.डी.जे.पंडित यांची धारणी, खामगावचे न्या.व्ही.व्ही. राजुरकर यांची वरुड, लातुरचे न्या.जी.जी. औटी यांची अमरावती, साताराचे न्या.एस.एस. भिंगारदेव यांची अमरावतीत बदली झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्टार जनरल समीर एस. अडकर यांच्या स्वाक्षरीनिशी हे बदलीचे आदेश काढण्यात आले आहे.

# इन्स्टाग्रामवर शस्त्रासह व्हिडीओ अपलोड करणे पडले महागात

## शस्त्रासह दोघे अटकेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

हातात शस्त्र घेऊन इंस्ट्राग्रामवर व्हिडीओ अपलोड करणाऱ्या युवकासह शस्त्र बाळगणाऱ्याला पोलिसांनी अटक करुन गुन्हा दाखल केला. मोहम्मद झिशान मोहम्मद मतिन (वय २१, रा. जमील कॉलनी) आणि मोहम्मद युनूस मोहम्मद युसूफ (वय २३. रा. अलीमनगर) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत.

सोशल मीडियावर काही युवक वेगवेगळे व्हिडीओ अपलोड करतात तर काही युवक अवैध शस्त्रे, पिस्टल, कोयता अशा अनेक प्रकारची घातक शस्त्रे घेऊन रिल बनवितात आणि स्वतःच्या इन्स्ट्राग्रामवर ठेवतात. परंतु धार्मिक सन व उत्सव पाहता शहर पोलीस सोशल मीडियावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. दरम्यान एका युवकाने हातात कोयता घेऊन स्वतः च्या झिशान खान (झेड-के) या इन्स्ट्राग्राम आयडीवर फोटो अपलोड केल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी युवकाचा शोध घेतला आणि सायंकळपर्यंत त्याला ताब्यात घेतले.तसेच त्याची कसून चौकशी केली असता व्हिडीओमधिल कोयता मोहम्मद युनूसच्या घरी ठेवल्याचे त्याने सांगितले. तेव्हा पोलिसांनी त्यालासुध्दा अटक करून शस्त्र जप्त केले आणि दोन्ही युवकांवर गुन्हा दाखल केला.

# लूटमार प्रकरणातील मुख्य सूत्रधार बत्रा अटकेत

## मित्रांच्या मदतीने लुटले होते २.७५ लाख रुपये



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

जयस्तंभ चौकात दिवसाढवळ्या एका युवकाजवळील २ लाख ७५ हजार ३२० रुपयांची रक्कम लुटल्या प्रकरणातील मुख्य सुत्रधाराला गुन्हेशाखेच्या युनिट वनच्या पथकानेअटक केली. कुणाल राजकुमार बत्रा (वय २२, रा. कंवरनगर) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.

मंगेश वासुदेव काळे हा २७मार्च रोजी दुकान मालकाच्या घरून सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारा २ लाख ७५ हजार ३२० रुपये घेऊ जयस्तंभ चौकातून दुकानात जात होन तेव्हा अचानक दुचाकीसमोर ४ ते युवक आलेआणि चाकूच्या धाकावर मंगेश जवळील बॅगमध्ये ठेवलेली रक्कम व बॅग घेऊन पसार झाले. या घटनेत गुन्हेशाखेच्या पथकाने प्रथम एका बालगुन्हेगाराला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली होती. तेव्हा त्याने सहा साथीदारांची नावे पोलिसांना सांगितली. त्यानंतर पोलिसांनी फैजान उर्फ गिल्ला वल्द फिरोज खान याला अटक केली होती. तसेच त्याची कसून चौकशी केली असता गुन्ह्याचे नियोजन कुमाल बत्राने केले असून मुख्य सुत्रधार कुणाल असल्याचे सांगितले. तेव्हा लगेच पोलिसांनी कुणाल बत्राला अटक केली. या कारवाईत पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलीस कर्मचारी सतीष देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउद्दीन खतीब, नाझीमउद्दीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम यांचा समावेश होता.

# गोपाल पाटील अरबट यांची शिवसेना जिल्हाप्रमुखपदी फेरनियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर**

शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेशानुसार संघटनेने नुकत्याच काही नियुक्त्या केल्यात. त्यामध्ये दर्यापूर, अचलपूर व धारणीची जबाबदारी असलेले शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटिल अरबट यांच्यावर विश्वास टाकून त्यांना दर्यापूर सोबतच अमरावती विभागाची जबाबदारी देऊन अमरावती शहर शिवसेनामय करण्याच्या सुचना दिल्या आहेत.



गोपाल पाटिल अरबट हे आक्रमक जिल्हाप्रमुख ओळखले जातात. शेतकरी, शेतमजुर, निराधार, दिव्यांग, विधवा महिला. पीक विमा योजना यासह वेळप्रसंगी सर्वसामान्यांच्या हाकेला ओ देणारा व जिथे अन्याय होत असेल तिथे सर्वात प्रथम हजर असणारा अशी ओळख गोपाल पाटील अरबटयांची आहे. रुग्णसेवा व दांडगा जनसंपर्क यातून त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली. या सर्व बाबीचा विचार करुन पक्षाने त्यांच्यावर पुनश्च विश्वास टाकला आहे. त्यांना दर्यापूरसह अमरावती विभागाचे जिल्हाप्रमुख म्हणुन नियुक्त केले आहे. ही नियुक्ती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा. डॉ श्रीकांत शिंदे, शिवसेना नेते तथा अध्यक्ष राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग (मंत्री दर्जा) आनंदराव अडसूळ यांच्या आदेशाने तसेच संपर्क मंत्री ना. संजय राठोड, शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना राष्ट्रीय सचिव कॅप्टन अभिजित अडसुळ, अमरावती जिल्हा सहसंपर्क प्रमुख रविंद्र गणोरकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गोपाल पाटिल अरबट यांची शिवसेना जिल्हाप्रमुखपदी फेरनिवड झाल्याने दर्यापूर अंजनगाव अमरावती येथिल शिवसैनिकात उत्साह संचारला आहे. शिवसैनिकांनी फटाके फोडुन व पेढे वाटुन आनंद साजरा केला. गोपाल पाटिल अरबट यांनी त्यांच्या नियुक्तीबद्दल उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्यासह नेत्यांचे आभार मानत पक्षवाढीसाठी अजून जोमाने काम करणार असल्याचे म्हटले आहे.

# टॅलेंट सर्च परीक्षेत....मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १४ वडाळी चे १८ विद्यार्थी उत्तीर्ण

## मुख्याध्यापिका निलीमा लव्हाळे यांचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

एज्यूमिट अक्डमी द्वारा आयोजित भारत टॅलेंट सर्च(इढड)परीक्षा १९ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेमध्ये मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १४ वडाळी येथील २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होतात त्यापैकी १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले सदर परीक्षेचा निकाल हा ८२ टक्के



लागला असून मुलांनी मिळवलेल्या या घवघवीत यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सदर परीक्षेसाठी वर्गशिक्षिका स्मिता वानखडे, ज्योत्स्ना खडसे, मनीषा वाकोडे वैशाली देशमुख यांनी मुलांना विशेष मार्गदर्शन केले. महानगरपालिकेत शिकत असणाऱ्या मुलांना गुणवत्तापूर्ण व जीवनाभिमुख शिक्षण मिळावे याकरिता,तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची लहान वयापासूनच ओळख व्हावी उद्देशाने हा नावीन्यपूर्ण उपक्रम यावर्षी पासून शाळेच्या मुख्याध्यापिका निलीमा लव्हाळे शाळेत सुरु केलेला आहे. याकरिता मनपा अमरावती चे शिक्षाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम ,शाळा निरीक्षक योगेश पखाले , शाळा व्यवस्थापन समिती त्याचप्रमाणे मनपा शाळा क्रमांक १४ येथील कार्यरत येथील सर्व शिक्षक वृंद यांनी मुलांचे अभिनंदन केले आहे. मुलांच्या या यशाबद्दल विद्यार्थी आणी शिक्षकांचे पालकवर्गानेही आनंद व्यक्त केलेला आहे.

# २१ किलो गांजा सह दोघांना पकडले : चांदूर रेल्वे पोलिसांची कार्यवाही : ५ लाख १ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७चांदूर रेल्वे**

दोन व्यक्ती अंमली पदार्थ चांदूर रेल्वे शहरात आणत आहे अशी खात्रीशीर माहिती चांदूर रेल्वे पोलिसांना मिळाली. त्यावरून चांदूर रेल्वे ते तळेगाव मार्गावर ६ एप्रिल रोजी दूपारी कसुन तपासनी केली असता राजना फाटयाजवळ दोन संशयीत व्यक्तीकडुन मिळुन आले. त्यांच्या जवळील दोन बोरीची झडती घेतली असता४ लाख २३ हजार ७०० रूपये किंमतीचा २१.१८५ कि.ग्रॅ. गांजा मिळाला.गांजासह बाईक व दोन मोबाईल असे एकुण ५ लाख १ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करून दोघांना पकडण्यात आले.

## राजना फाट्या जवळील घटना

चांदूर रेल्वे पोलिसांना दोन इसम अंमली पदार्थ घेऊन दूपारी मोटर सायकलने दूपारी चांदूर रेल्वे कडे येणार आहे अशी गुप्त माहिती मिळाली. त्याची खात्री केल्यानंतर चांदूर रेल्वे पोलिसांनी चांदूर रेल्वे एसडीपीओ यांची परवानगी घेऊन तळेगाव दशासर रस्त्यावर संशयितांचा शोध घेत सुरू केले



असता. राजना फाट्याजवळ दोन इसम दोन पांढऱ्या बोरीसह संशयितरित्या मिळून आले.त्यांच्या जवळील दोन बोरीची झडती घेतली असता त्यामध्ये २१.१८५ किलोग्रॅम ४ लाख २३ हजार ७०० रुपये किंमतीचा गांजा त्या सोबतच ६० हजाराची बजाज पल्सर (एमएच २७ बीयु २६८८)व १८ हजाराचे दोन मोबाईल असे एकूण ५ लाख १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. घटनास्थळी अंमली पदार्थाची नियमानुसार जप्ती पंचनामा करण्यात आला. आरोपी मनोज वामनराव मुद्रके (वय ४८) रा वडगाव राजदी ता.धामणगाव रेल्वे, हल्ली मुक्काम श्रीहरी नगर दत्तापूर ता.धामणगाव रेल्वे व खेळबिंद्र राजारामजी इटी वाले (वय ५२) रा. गुंजी ता.धामणगाव रेल्वे यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर कलम ११५/२५ कलम ८(सी), २०(ब), (।।)(सी),२९ एनडीपीएस क्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. ही कार्यवाही पोलिस अधिक्षक विशाल आनंद,अपर पोलिस अधिक्षक पंकज कुमावत, चांदूर रेल्वेएसडीपीओ अनिल पवार यांच्या मार्गदर्शनात चांदूर रेल्वे ठाणेदार आकरे, सपोनि शरद आहेर, पोउपनि नितेश झाडे, पोउपनि नंदलाल लिंगोट, पोलिस अंमलदार शिवाजी घुगे,नितीन शेंडे,पवन घरडे,गजानन वाघमारे,प्रशांत ढोके,अश्विनी आखरे व चालक चंद्रकांत गाडे यांनी कामगारी बजावली.

# नागरिक म्हणतात !! सांगा पुढाऱ्यांनो कधी निघणार मुहूर्त

## टेस्ट फ्लाइट आटोपली तरी प्रवासी विमानोड्डाणाचा अजूनही मुहूर्त निघेना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी घोषणा केलेली ३१ मार्च ही तारीख टळून आता सहा दिवस लोटले तरी अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून अलायन्स एअरलाइन्सच्या प्रवासी विमानाने उड्डाण केले नाही. विशेष म्हणजे टेस्ट फ्लाईट कॅलिबर चाचणी असे सर्व आटोपले तरी अलायन्सच्या अधिकृत वेबसाइटवर ना बेलोरा विमानतळाचे नाव आहे. ना मुंबई-अमरावती-मुंबई विमानाचे तिकीट दिसत आहे. एवढेच नव्हे तर अलायन्सने चेक आऊट, चेक ईन, लगेज ट्रान्सफरसाठी विमानतळावर ना कोणती सोय केली ना, याबाबतअद्याप खात्रीलायक माहिती समोर आली नाही. त्यामुळे प्रवासी विमानोड्डाणाचा मुहूर्त अद्याप मिळालाच नसावा, असे विनोदाने शहरवासी बोलत आहेत.तर विमानतळाचा मुहूर्त कधी निघणार हे जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी तरी सांगावे अशी चर्चा शहरात रंगली आहे.



पहिले विमानोड्डाण असल्यामुळे काही वेळ लागतोच हे अपेक्षित असले तरी सर्व सज्जता झाली. डीजीसीएने परवानाही दिला तरी विमानोड्डाणाची तारीख कोणी देण्यास तयार नसून एमएडीसीचे अधिकारीबोलण्यास तयार नाहीत.नेते मंडळी ही काही बोलण्यास तयार नाहीत त्यामुळे नेमके ७२ आसनी प्रवासी विमान बेलोरा विमानतळवरून कधी हवेत झेपावणार हे एक कोडेच ठरले आहे. जो येतो तो तारीख सांगून मोकळा होतो. परंतु, विमान मात्र उडत नाही. टेस्ट फ्लाइट घेणाऱ्या वैमानिकांनी अलायन्स एअरलाइन्स व डीजीसीएला नेमका कसा अहवाल सोपवला तेही समजण्यास मार्ग नाही. या वैमानिकांनी अहवाल सोपवल्यानंतर एअरलाइस विमान उडाणाच्या दृष्टीने मनुष्यबळ, विविध यंत्रणांची जुळवाजुळव करत असते. यासाठी किमान एक आठवड्याचा कालावधी लागतो, अशी माहिती विमानोड्डाण क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिली आहे.

# जय जय श्रीरामच्या घोषणेने दुमदुमली अंबानगरी

## रामरथ, ढोलताशा पथक, वारकरी दिंडी, आदिवासी नृत्य विविध देखावे ठरले आकर्षण





**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

रामनवमी या सणाला हिंदू धर्मात विशेष महत्त्व असून शहरात श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीने रविवारला सायंकाळी भव्य शोभायात्रा प्र काढण्यात आली. रामरथ, ढोलताशा पथक, वारकरी दिडी, आदिवासी नृत्य तसेच सामाजिक संदेश देणारे विविध देखावे, हरिपाठ मंडळ, साहसी खेळ, महापुरुषांच्या प्रतिमा शोभायात्रेचे खास आकर्षण होते. यावेळी रामभक्तांच्या जय जय श्रीराम... अशा जयघोषाणे अंबानगरी दुमदुमली होती. बालाजी प्लॉट येथून प्रारंभ झालेली ही शोभायात्रा राजापेठ, राजकमल, श्याम चौक, जयस्तंभ, सरोज चौक, जवाहरगेट, मार्गे श्री गजानन महाराज मंदिर, वकील लाइन मार्गक्रमण करीत गांधी चौक परीसरात समापन झाले.

शहरात १९८५ पासून सुरू असलेली मानाची शोभायात्रा श्रीराम नवमी शोभायात्रा समितीद्वारा काढण्याली. रविवारला सायंकाळी सीतारामबाबा मंदिर प्रांगण, बालाजी प्लॉट येथे पूजेचे मुख्य यजमान निकिता व जयेश राजे पवार यांच्या हस्ते श्रीरामच दरबाराचे पूजन व महाआरती करून उपस्थित संत महंतांचे मार्गदर्शन व आशीर्वाद घेऊन शोभायात्रेचा सायंकाळी शुभारंभ झाला.श्री शामखाटू नरेश बाबांचा भव्य दरबार तसेच रामरथ, ढोलताशा पथक, वारकरी दिडी, आदिवासी नृत्य तसेच सामाजिक संदेश देणारे विविध देखावे, हरिपाठ मंडळ, साहसी खेळ, महापुरुषांच्या प्रतिमा हे या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले. विशेषतः आदिवासी नृत्याने सर्व अमरावतीकरांचे लक्ष वेधून घेतले. शोभा यात्रेच्या सुरक्षेसाठी बजरंग दलाचे २५० ते ३०० बजरंगी तसेच महिलां च्या सुरक्षेसाठी दुर्गावाहिनीच्या १०० ते १५० दुर्गा शोभायात्रेत तैनात होत्या. शोभायात्रेच्या स्वागतासाठी संपूर्ण शहरात ध्वज, पताका लावण्यात आले होते. बालाजी प्लॉट येथून प्रारंभझालेली शोभायात्रा प्रथम राजापेठ, राजकमल, शयाम चौक, जयस्तंभ, सरोज चौक, जवाहरगेट, मार्गे श्री गजानन महाराज मंदिर वकील लाइन मार्गे गांधी चौकात पोहोचली. या ठिकाणी आरती करून श्रीराम दरबारची सांगता करण्यात आली. पुष्पवर्षावाने स्वागतशोभायात्रेच्या मार्गाने घर व प्रतिष्ठानासमोर रांगोळी काढून, दिवे लावून, पुष्पवर्षाव करून शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. राजकमल चौकात शोभायात्रेवर पुष्पवर्षाव केला.

**प्रसाद वाटप, शरबत वाटप**

शोभायात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी प्रसाद वाटप तसेच जागोजागीपाणी, बुंदी, शरबत वाटप करण्यात आले. बुट्टी प्लॉट श्री गुरुद्वारच्या वतीने राजापेठ चौकात शोभायात्रेत सहभागी रामभक्तांना भव्य शरबत वाटप करण्यात आले.या शोभायात्रा मध्ये सर्वच राजकीय पक्षांचे नेते यांनीही सहभाग घेतला होता.

# निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वयंसेवकांमार्फत 'उन्हाळी शिबिर'

## विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुटीवर येणार गडांतर




**विदर्भ प्रजासत्ताक दि. ७ अमरावती**

शासन निर्णयाप्रमाणे, विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत कृती कार्यक्रम राबविणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. तसेच प्रमाणे निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन स्तरावर आणण्यासाठी शाळा पातळीवर 'उन्हाळी शिबिर' आयोजित करण्याबाबत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी आदेशित केलेले आहे.या आदेशा मुळे विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुटिवर गडांतर आले आहे,उन्हाळ्यात मुले पालका सोबत बाहेर गावी जातात मग या शिबिरात हजर कसे राहणार हा प्रश्न राहणार आहे.


**उन्हाळी शिबिराचा हेतू**

अल्पकालीन, संरचित शैक्षणिक शिबिरांद्वारे विद्यार्थ्यांमधील संभाव्य शैक्षणिक तफावत भरून काढण्यास मदत होईल आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सातत्य राखले जाऊ शकेल. या शिबिरांमुळे विद्यार्थ्यांची पायाभूत शैक्षणिक कौशल्ये अधिक सक्षम होऊन पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक तयारी होऊ शकेल. उन्हाळी शिबिराचा अवधी व कामकाज दररोज किमान एक तास स्वयंसेवकांमार्फत शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करावे लागणार आहे.

उन्हाळी शिबिराचा कालावधी:माहे एप्रिलचा शेवटचा आठवडा ते मे,जून २०२५ या दरम्यान एकूण ६ आठवडे इतक्या कालावधीचे उन्हाळी शिबीर शाळा पातळीवर आयोजित करावे असे निर्देश आहेत.

# शुक्रवारी भगवान श्री हनुमंतरायाची भव्य विशाल शोभायात्रा निघणार

## श्री महाकाल उज्जैनचा मजराज (हत्ती), हरियाणा येथील प्रसिद्ध झांज पथक राहणार आकर्षण





**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

श्री हनुमांज जन्मोत्सव समिति बुधवारा, अमरावती च्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही अन्मवान श्री हनुमान जन्मोत्सव त्या पूर्व संध्येला म्हणजेच शुक्रवार दिनांक ११ एप्रिल २०२५रोजी दुपारी ४ वाजता बुधवारा चौक अमरावती येथून भव्य शोभायात्रे चे आयोजन केले आहे.

शोभायात्रेत मुख्य आकर्षण १५ ट्रॅक्टर त्या वर भगवान श्री हनुमान, श्री राम, श्री विठ्ठलरुखमाई अमरावती ची कुलस्वामिनी श्री अंबामाता, श्री एकवीरा माता, श्री भगवान शंकरजी, छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची मूर्तीरुपी झाकी तर काही पौराणिक विषयांवर जिवंत झाकी राहणार आहे.

शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे श्री महाकाल उज्जैन मध्यप्रदेश येथील श्री मजराज (हत्ती), तसेच हरियाणा येथील प्रसिद्ध झांज पथक, तसेच भगवान श्री हनुमानावी फुलांनी त्यार केलेली मुर्ती, श्री हनुमानाची आकर्षक रुपरेखा साकारणारी व्यक्ती, महाराष्ट्रातील प्रसिद्ध ढोल पथक, वारकरी दिंडी, बैंजो, आकर्षक डी जे., संदल पथक या सोबतच स्वसंरक्षणाचे प्रात्याक्षीक सादर करणारी टीम राहणार आहे.स्थानिक राजकमल चौकात शोभायात्रा पोहचत्या नंतर त्या ठिकाणी उपस्थीत साधू संत व मान्यवरा वे हस्ते भगवान श्री हनुमंतराया ची महाआरती होईल. सोबतच फटाक्याची आकर्षक आतिशबाजी होईल. तसेच शोभायात्रेत खासदार बळवंत भाऊ वानखडे, माजी पालकमंत्री श्रीमती यशोमती ताई ठाकूर, माजी खासदार श्री अनंतराव गुढे, माजी पालकमंत्री डॉ. सुनिलभाऊ देशमुख, आमदार श्री धीरज लिंगाडे, माजी महापौर श्री विलासभाऊ इंगोले, शहर अध्यक्ष श्री बबलूभाऊ शेखावत, यांच्यासह अनेक मान्यवर व हजारो श्री हनुमान भक्त शोभायात्रेत सहभागी होणार आहे.

शोभायात्रेचे यशस्वी आयोजनासाठी युवाकार्यकर्ते अनिकेत ढेगले, डॉ. संजय शिरभाते, राजू मैले, सुरेश रतावा, गजानन राजगूरे, प्रमोद इंगोले, पंकज लुंगीकर, सागर इंगोले, निखिल बिजवे, संकेत साहू, अनुप साहू, सनी काव्हे, जय सापरीया, गौरव बेलुरकर, वेतन ईटणारे, निशांत जातक, राजा पिंजरकर, नीलेश सराफ, संतोष चिखलकर, मयुर जलतारे, वैभव कोनलाडे अर्जुन इंगोले पवन शर्मा चेतन याऊल, कनक कपूर, श्रीकांत गणेशकर, शेखर गायकवाड, आकाश नवघरे, सनी महल्ले, अनिकेत नवघरे, प्रथमेश बाखडे यांचे सह अनेक कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.

**शोभायात्रा मार्ग**

बुधावारा अंबागेट गांधी चौक जवाहर गेट - सराफा जैनमंदिर भाजीबाजार बजरंग चौक होईल.

# आमदार प्रतापदादा अडसड यांची पंचायतराज समितीच्या सदस्यपदी निवड

## धामणगाव मतदार संघात फटाके फोडून जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि ७धामणगाव**

आमदार प्रतापदादा अडसड यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये सलग दुसऱ्यांदा विजय मिळवल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची दखल घेवुन पंचायतराज समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली असून या निवडीचा जल्लोष धामणगाव मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटुन जल्लोष साजरा केला.आमदार प्रतापदादा अडसड यांची आजवरची विकासभिमुख दृष्टिकोन विचारत घेऊन पक्षश्रेष्ठींनी



त्यांची पंचायतराज समितीच्या सदस्यपदी निवड करणेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस केली होती. त्यानुसार आज मुंबई येथे मंत्रालयात पार पडलेल्याबैठकीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार प्रतापदादा अडसड यांची पंचायतराज समितीच्या सदस्यपदी निवड केली आहे. आमदार प्रतापदादा अडसड यांची पंचायतराज समितीच्या सदस्यक्षपदी निवड झाल्यामुळे धामणगावं विधानसभा मतदारसंघातील भाजपा-शिवसेना-रा. कॉ. महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. पंचायतराज विभागासारख्या ग्रामीण भागाशी नाळ जोडल्या गेलेल्या विभागावर आमदार प्रतादादा अडसड यांची निवड झाल्यामुळे मतदारसंघातील भाजपा कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

# पाण्याचा नियोजन नसल्याने लोकांना पाणी मिळत नाही ; रवी राणा यांचा आरोप

## आमदार रवी राणा यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकाऱ्या सोबत बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

अमरावती शहरात दिवसाआड तर बडनेरा शहरात तीन दिवसांनी पाणीपुरवठा होतो, तर अनेक भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होतो तर काही ठिकाणी आठ आठ दिवस पाणीपुरवठाच होत नाही त्यामुळे आज आमदार रवी राणा यांनी अमरावतीच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकाऱ्यासमवेत नागरिकांना सोबत घेऊन आढावा बैठक



घेतली, मुबलक पाणी असून सुद्धा पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन केलं जात नाही.. त्यामुळे पाण्याचं योग्य नियोजन करा तर जे पाणीपुरवठा अधिकारी कर्मचारी पाणी योग्य प्रकारे सोडत नसेल तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करा, जे लोक पाणी चोरी करतात त्यांच्यावर गुन्हे दाखल करा अशा सूचना रवी राणा यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या,पाणी सोडण्याच नियोजन व्यवस्थित करा कारण अमरावती बडनेरा शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वर्धा धरणात मुबलक पाणीसाठा आहे, मात्र याचं नियोजन योग्य प्रकारे करत नाही अधिकारी पाणी सोडण्याच्या नियोजनाकडे व्यवस्थित बघत नाही पाणी सोडण्याचा बंद करण्याचा टाईम टेबल नाही त्यामुळे यापुढे अधिकाऱ्यांनी पाणी समस्या बाबत दिरंगाई केली तर कुणाला सोडणार नाही असा इशारा आमदार रवी राणा यांनी दिला.

# भिवंडी-संत्रागाछी उन्हाळी विशेष अनारक्षित ट्रेन९ ते २६ एप्रिलपर्यंत दर बुधवारी धावणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

उन्हाळ्यात प्रवाशांची मागणी तसेच वाढलेली गर्दी बघता गाडी क्र. ०९१४९ ही साप्ताहिक विशेष अनारक्षित ट्रेन सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, ती ९ ते २३ एप्रिल या कालावधीत भिवंडी ते सांकराईल व संत्रागाछी ते भिवंडी अशी धावणार आहे. दर बुधवारी ही विशेष अनारक्षित ट्रेन असून भिवंडी येथून ती रात्री १०.३० वाजता सुटेल व सांकराईल गुड्स टर्मिनल येथे तिसर्या दिवशी दुपारी १ वाजता पोहोचेल. मार्गात ही गाडी कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, नागपूर, गोंदिया, रायपूर, बिलासपुर, झारसुगुडा, राऊरकेला, चक्रधरपूर, टाटानगर आणि खरगपूर हे थांबे घेणार आहे.गाडी क्र. ०११५० संत्रागाछी-भिवंडी ही १२ ते २६ एप्रिल या कालावधीत दर शनिवारी धावणार असून रात्री ९ वाजता संत्रागाछी येथून निघेल व तिसर्या दिवशी रात्री ११.३० वाजता भिवंडी रोड येथे पोहोचेल. १० सामान्य द्वितीय श्रेणी, २ द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन आणि १० पार्सल व्हॅन असे या ट्रेनचे स्वरूप आहे.अनारक्षित ट्रेन असल्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना आरक्षण करण्याचे गरज नाही. त्याचप्रमाणे मुंबई व हावडाकडे जाण्यास इच्छुक असलेल्या अमरावती, बडनेरा येथील प्रवाशांना हा आणखी एक अतिरिक्त पर्याय उपलब्ध झाला आहे. कमी तिकिटात प्रवास करता येणे शक्य आहे. तसेच बडनेराहून नागपूर, शेगाव येथे जाण्यासाठी ही विशेष सुविधा झाली आहे.